महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# (सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२)

## मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) अधिनियम, १९८३

(३० सप्टेंबर, २००५ पर्यंत सुधारलेला)

**(MAHARASHTRA ACT No. XLII OF 1983)**

## THE MUMBAI METROPOLITAN REGION SPECIFIED COMMODITIES MARKETS (REGULATION OF LOCATION) ACT, 1983

**(As Modified upto the 30th September 2005)**

★

२००६

[ किंमत—रु.            ]

# मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) अधिनियम, १९८३

[सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२]

## अनुक्रमणिका


उद्देशिका पृष्ठ क्रमांक

कलमे

**प्रकरण एक**

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ आणि लागू करणे . . . . . . . . . .

२. व्याख्या . . . . . . . . . . . . . . . .

**प्रकरण दोन**

**बाजारक्षेत्र आणि बाजारतळ जाहीर करणे आणि अनधिकृत ठिकाणी व्यापार करण्यास मनाई**

३. बाजारक्षेत्र आणि बाजारतळ जाहीर करणे. . . . . . . . . . . .

४. पहिल्या बाजार समितीची स्थापना . . . . . . . . . . . .

५. विनिर्दिष्ट व्यापार कायदेशीरपणे करणाऱ्या व्यक्तींची नोंदणी . . . . . . . .

६. बाजारतळातील नोंदणीकृत व्यक्तींना बाजार समितीने पर्यायी व्यापारविषयक सोयी पुरविणे. . . . . . . . .

७. लायसनशिवाय कोणत्याही बाजारक्षेत्रात किंवा बाजारतळात विनिर्दिष्ट. व्यापार करण्यास मनाई. . . . . . .

**प्रकरण तीन**

**बाजार समित्यांची रचना**

८. बाजार समित्यांची स्थापना . . . . . . . . . . . . . .

९. बाजार समितीची रचना . . . . . . . . . . . . . .

१०. सदस्यांच्या निवडणुका घेण्याकरिता विनियम . . . . . . . . . .

११. सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे . . . . . . . . . . . . . .

१२. सभापती व उप सभापती धरुन सदस्यांच्या निवडणुकीसंबंधातील किंवा नामनिर्देशनासंबंधातील विवाद. . . . .

अनुक्रमणिका–चालू


| (१) | (२) |
|---|---|
| कलमे | पृष्ठ क्रमांक |
| १३. समितीच्या सदस्यांचा पदावधी . . . . . . . . . . . . | |
| १४. सदस्यांचा राजीनामा . . . . . . . . . . . . . . | |
| १५. सदस्यांना काढून टाकणे . . . . . . . . . . . . . . | |
| १६. नैमित्तिक रिकामी पदे . . . . . . . . . . . . . . | |
| १७. पदावधी संपल्यावर सदस्यांनी पद सोडणे व प्रशासकाची नेमणूक . . . . | |
| १८. सभापती व उप सभापती यांची निवड. . . . . . . . . . . . | |
| १९. सभापती व उप सभापती यांचा पदावधी . . . . . . . . . . | |
| २०. सभापती व उप सभापतीस मानधन. . . . . . . . . . . . | |
| २१. सभापती व उप सभापती यांची निवड . . . . . . . . . . . . | |
| २२. सभापती व उप सभापती यांचा राजीनामा . . . . . . . . . . | |
| २३. सभापती व उप सभापती यांस काढून टाकणे. . . . . . . . . . | |
| २४. सभापती व उप सभापती यांची तात्पुरती रिकामी होणारी पदे. . . . . . | |
| २५. सभापती व उप सभापती यांनी आपापल्या पदाचा कार्यभार स्वाधीन करणे. . व तो स्वाधीन करण्यास नकार दिल्यास त्याचे परिणाम. | |
| २६. स्थायी समितीची रचना . . . . . . . . . . . . . . | |
| २७. उप समित्या नेमणे. . . . . . . . . . . . . . . . | |
| २८. स्थायी समिती व उप समिती यांचे अधिकार, कामे इत्यादि . . . . . . | |
| २९. स्थायी समितीस किंवा उप समितीस समितीचे अधिकार प्रत्यायोजित करणे. . | |
| ३०. सभा व सभेचे कामकाज चालवणे . . . . . . . . . . . . | |
| ३१. पद रिकामे असताना सदस्यांनी कार्यवाही करणे, नियमाबाह्यतेमुळे समिती. . इत्यादिने केलेली कामे विधिअग्राह्य न ठरणे. | |


प्रकरण चार

बाजार समितीचे अधिकार व कर्तव्ये


| | |
|---|---|
| ३२. बाजार समितीचे अधिकारी व कर्तव्ये . . . . . . . . . . . . | |
| ३३. उप-विधींद्वारे लायसनच्या मंजुरीचे नियमन करणे . . . . . . . . | |
| ३४. फी बसविण्याचा समितीचा अधिकार. . . . . . . . . . . . | |
| ३५. समितीच्या स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधी तरतूद . . . . . . . | |
| ३६. लायसनधारकांकडून समितीच्या स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण . . . . . | |
| ३७. संविदा करणे . . . . . . . . . . . . . . . . | |

| (१) | (२) |
|---|---|
| कलमे | पृष्ठ क्रमांक |

**प्रकरण पाच**

**बाजार निधी, वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा वगैरे**

३८. **बाजार निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक** . . . . . . . . . . . .
३९. **ज्या प्रयोजनांसाठी बाजार निधीतून खर्च करावयाचा ती प्रयोजने** . . . .
४०. **विशेष निधींची रचना** . . . . . . . . . . . . . .
४१. **पैसे उसने घेण्याचा अधिकार** . . . . . . . . . . . .
४२. **लेखे व लेखापरीक्षा** . . . . . . . . . . . . . .
४३. अर्थसंकल्प . . . . . . . . . . . . . . . .
४४. अर्थसंकल्पीय तरतुदींचे पुनर्विनियोजन . . . . . . . . . . . .
४५. मालमत्ता व निधी इत्यादिंचा विनियोग . . . . . . . . . . . .
४६. वार्षिक अहवाल . . . . . . . . . . . . . . . .

**प्रकरण सहा**

**जमिनीचे संपादन**

४७. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या प्रकरण ८ च्या तरतुदी लागू असणे. . .

**प्रकरण सात**

**बाजार समितीचे अधिकारी व सेवक**

४८. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक . . . . . . . . . . . .
४९. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये . . . . . . . . . .
५०. अन्य अधिकाऱ्यांची व सेवकांची नेमणूक . . . . . . . . . . . .
५१. अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या सेवाशर्तीचे उप-विधींद्वारे नियमन करणे . . . . . .

**प्रकरण आठ**

**नियंत्रण**

५२. तपासणी, चौकशी, विवरणपत्रे इत्यादी सादर करणे . . . . . . . . . .
५३. अधिकारी, सेवक अथवा सदस्य यांचे महानगर आयुक्त इत्यादींस माहिती पुरविण्याचे कर्तव्य. . .
५४. लेखापुस्तके व इतर दस्तऐवज इत्यादी जप्त करणे. . . . . . . . . .
५५. बाजार समिती निष्प्रभावित करणे. . . . . . . . . . . . . .
५६. प्रशासकाची नेमणूक . . . . . . . . . . . . . .
५७. प्रशासकाचे अधिकार. . . . . . . . . . . . . . . .
५८. समितीची पुनःस्थापना. . . . . . . . . . . . . .

**प्रकरण नऊ**

**अपिले व पुनरीक्षण**

५९. अपिले . . . . . . . . . . . . . . . .
६०. ज्याविरूद्ध अपील करता येणार नाही असे आदेश . . . . . . . . . .

**अनुक्रमणिका—**समाप्त


| (१) | (२) |
|---|---|
| **कलमे** | पृष्ठ क्रमांक |
| ६१. कोणत्याही प्रकरणांचा अभिलेख मागविण्याचा राज्य शासनाचा अधिकार | |
| ६२. आदेश अंतिम असणे. | |
| ६३. अधिकारितेस रोध | |
| ६४. अपराध व शास्ती | |
| ६५. कंपन्यांचे अपराध | |
| ६६. अपराधांची दखल व न्यायचौकशी | |
| ६७. अपराध आपसात मिटवणे | |
| **प्रकरण दहा** | |
| **नियम व उप-विधी** | |
| ६८. नियम करण्याचा अधिकार | |
| ६९. उप-विधी करण्याचा समितीचा अधिकार | |
| **प्रकरण अकरा** | |
| **संकीर्ण** | |
| ७०. अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार | |
| ७१. समितीचा सभापती, उप सभापती, सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकारी आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे. | |
| ७२. सद्‌भावनापूर्वक करण्यात आलेल्या कृतीचे संरक्षण | |
| ७३. शासनास अथवा समितीस देय असलेल्या रकमांची वसुली | |
| ७४. प्रत्यायोजनाचा अधिकार | |
| ७५. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ लागू नसणे | |
| ७६. अडचणी दूर करणे | |
| **अनुसूची** | |

**सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२[१].**

[मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय बाजार (स्थान नियमन) अधिनियम, १९८३]

[या अधिनियमास २२ नोव्हेंबर, १९८३ रोजी राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २ डिसेंबर[१] १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

**या अधिनियमांत पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :—**

**सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ (४-९-१९९६)†**

**[२][मुंबई महानगर प्रदेशात] विनिर्दिष्ट विक्रेय वस्तूंच्या संबंधात, बाजार क्षेत्र आणि धाऊक बाजार यांचे स्थान निश्चित करण्यासाठी आणि विविध प्रकारच्या विक्रेय वस्तूंसाठी विविध बाजार क्षेत्रांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या वेगवेगळ्या बाजारांचे व्यवस्थापन आणि नियंत्रण करण्याकरिता बाजार समित्या स्थापन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा त्याला पूरक अथवा तदानुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

१९७५ चा महा. **ज्याअर्थी,** मुंबई महानगर प्रदेशातील क्षेत्रांच्या योग्य, व्यवस्थित व जलद विकासाचे नियोजन, समन्वयन आणि पर्यवेक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ, [३][मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४] अन्वये [४][मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण] स्थापन करण्यात आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** लोकसंख्या आणि व्यापारविषयक व्यवहार यांची झपाट्याने वाढ झाल्याने, [५][बृहन्मुंबईमध्ये आणि विशेषकरून [६][दक्षिण मुंबईमध्ये] दाट लोकवस्ती परिणामी पडणारा वाहनव्यवस्थेवरील ताण, जागेची टंचाई आणि इतर समस्या आक्राळविक्राळ स्वरूप धारण करीत आहेत आणि म्हणून महानगर प्राधिकरणाच्या स्थापनेमागची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, राज्य शासनाने, या जुन्या मुंबई बेटावरील गर्दी कमी करून होतील तितके व्यापारविषयक व्यावहार [६][दक्षिण मुंबईबाहेर] नेण्याचे धोरण स्वीकारले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** गर्दी काही प्रमाणात कमी करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र कृषि उत्पादन खरेदी-विक्री (नियनम) अधिनियम, १९६३ अन्वये कांदे, बटाटे यांसारख्या काही कृषि उत्पादनाचे घाऊक बाजार [७][नवी मुंबईत] नेण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** कापड आणि लोखंड व पोलाद यांसारख्या काही कृषीतर उत्पादनासाठी तात्काळ आणि इतर विक्रेय वस्तूंसाठी शक्य तितक्या लवकर, घाऊक बाजारांचे स्थान निश्चित करण्याची किंवा त्यात फेरबदल करण्याची आवश्यकता दिवसेंदिवस वाढत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** असे बाजार अन्य ठिकाणी स्थापन करता यावेत किंवा हलविता यावेत म्हणून राज्य शासनाला, महानगर प्राधिकरणाला किंवा अन्य कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला समर्थ करणारी कोणतीही कायदेशीर तरतूद सध्या अस्तित्वात नाही ;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता **महाराष्ट्र शासनाचे राजपत्र,** असाधारण भाग पाच, दिनांक ४ जुलै १९८३, पृष्ठे २५४-२५६ पाहा.

†. ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

२. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२५, अनुसूची, नोंद (४) १ द्वारे ' बॉम्बे महानगर प्रदेश ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) २ (अ) (दोन) द्वारे ' बॉम्बे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) २ (अ) (एक) ' बॉम्बे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ' या मजकूराऐवजी हा मदकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) २ (ब) (एक) द्वारे ' ग्रेटर बॉम्बे ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

६. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) २ (ब) (दोन) द्वारे ' दक्षिण बॉम्बे ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) (२) (क) द्वारे ' न्यु बॉम्बे ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**आणि ज्याअर्थी,** अशा कायद्यान्वये वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा विक्रेय वस्तूंच्या संबंधात बाजारक्षेत्राचे आणि घाऊक बाजारांचे स्थान निश्चित करण्यासाठी आणि विविध बाजारक्षेत्रातील विविध प्रकारच्या विक्रेय वस्तूंसाठी स्थापन करण्यात आलेल्या वेगवेगळ्या बाजारांचे व्यवस्थापन आणि नियंत्रन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा त्याला पूरक अथवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी तातडीने कायदा करणे आवश्यक आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**प्रकरण एक**

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास [१][मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियनम) अधिनियम, १९८३] असे म्हणावे.

(२) तो, [२][मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४] यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे त्यावेळी [३][मुंबई महानगर प्रदेशात]समाविष्ट असलेल्या सर्व क्षेत्रांना लागू होईल.

(३) तो, [४][बृहन्मुबईत] तात्काळ अंमलात येईल. तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनाद्वारे, नियत करील अशा दिनांकास मुंबई महानगर प्रदेशातील अन्य कोणत्याही प्रदेशात अंमलात येईल.निरनिराळ्या क्षेत्रांतील निरनिराळे नियत करता येतील.

(४) (क) सर्व प्रथम तो अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या [४][बृहन्मुबईतील] (१) कापड आणि लोखंड व पोलाद या दोन विक्रेय वस्तूंना लागू होतो.

(ख) राज्य शासनास, स्वाधिकारे किंवा महानगर प्राधिकारणाने केलेल्या विनंतीवरून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कलम ७० खालील अनुसूचीमध्ये अन्य कोणत्याही विक्रेय वस्तूचा समावेश करून तीत सुधारणा करता येईल आणि त्याच किंवा तत्सम अधिसूचनेद्वारे, हा अधिनियम अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून, कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही विक्रेय वस्तूला (मग ती अनुसूचीत पूर्वीच समाविष्ट केलेली असो किंवा नव्याने समाविष्ट केलेली असो) लागू हेईल ; वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी आणि विवीध प्रकारच्या विक्रेय वस्तूंसाठी निरनिराळे दिनांक विनिर्दिष्ट करता येतील.

२. या अधिनियमातील संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) “ प्राधिकरण ” किंवा “ महानगर प्राधिकरण ” याचा अर्थ [५][मुंबई महानगर प्रदेश विकास १९७५ चा प्रधिकरण अधिनियम] अन्वये स्थापना करण्यात आलेले [६][मुंबई महानगर प्रदेश विकास महा. ४. प्राधिकरण असा आहे]; १९७५ चा महा. ४.

(२) “ उप-विधी ” याचा अर्थ या अधिनियमान्वये बाजार समितीने तयार केलेली उप-विधी, असा आहे.

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, उपनुसूची नोंद (४) ३(अ) द्वारे ‘ बॉम्बे महानगर प्रदेश ’ विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार स्थापन नियमन) अधिनियम, १९८३ ’ या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) ३ (ब) (दोन) द्वारे ‘ बॉम्बे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) ३ (ब) (एक) द्वारे ‘ बॉम्बे महानगर प्रदेश ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) ३ (क) व (ड) द्वारे ‘ ग्रेटर बॉम्बे ’ या मजकूराऐवजी हा मदकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) ४ (अ) (दोन) द्वारे ‘ बॉम्बे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

६. वरील अधिनियमाची अनुसूची, नोंद (४) (४) (अ), (एक), (ब) (दोन) द्वारे ‘ बॉम्बे महानगर प्रदेश विभाग प्राधिकरण ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) “ मुख्य कार्यकारी अधिकारी ” याचा अर्थ संबंधित बाजार समितीने तयार केलेले उप-विधी; अधिकारी असा आहे ;

(४) “ समिती ” किंवा “ बाजार समिती ” याचा अर्थ कोणत्याही विनिर्दिष्ट विक्रेय वस्तूंसाठी कोणत्याही बाजारक्षेत्रात रचना केलेली, असा आहे समिती ;

(५) “ विक्रेय वस्तू ” किंवा “ विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू ” अनुसूचीमध्ये त्यावेळी विनिर्दिष्ट केलेली कोणतीही विक्रेय वस्तू, असा आहे ;

(६) “ बाजार ” याचा अर्थ कोणत्याही बाजारक्षेत्रात स्थापन केलेला कोणताही, असा आहे प्रमुख बाजार व त्यामध्ये दुय्यम बाजाराचा समावेश होतो ;

(७) “ बाजारक्षेत्र ”, असा आहे कोणत्याही विनिर्दिष्ट विक्रेय वस्तूसाठी बाजारक्षेत्र म्हणून कलम ३ खाली जाहीर केलेले कोणतेही क्षेत्र, असा आहे ;

(८) “ बाजारतळ ” याचा अर्थ, कोणत्याही बाजारासाठी कलम ३ अन्वये बाजारतळ म्हणून जाहीर केलेले कोणतेही क्षेत्र, असा आहे व त्यामध्ये दुय्यम बाजारतळाचा समावेश होतो ;

१९७५ चा महा. ४. (९) “ महानगर आयुक्त ” याचा अर्थ, [१][ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४] अन्वये नेमलेला महानगर आयुक्त, असा आहे ;

(१०) “ विहित ” याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(११) “ नोंदवही ” याचा अर्थ, कलम ५ अन्वये तयार केलेली व ठेवलेली, नोंदवही असा आहे ;

(१२) “ नोंदणीकृत व्यापारी ” याचा अर्थ, संबंधित व्यापारासाठी नोंदवहीत त्यावेळी जिचे नाव नोंदलेले आहे अशी व्यक्ती, असा आहे ;

(१३) “ विनियम ” याचा अर्थ, कलम १० अन्वये केलेले विनियम, असा आहे ;

(१४) “ नियम ” म्हणजे, या अधिनियमान्वये राज्य शासनाने तयार केलेले नियम, असा आहे ;

(१५) “ विक्री ” या शब्दाच्या व्याकरणिक रूपभेदांसह व सजातीय शब्दप्रयोगांसह “ विक्री ” याचा अर्थ, एका व्यक्तीने दुसरीला, रोखीने किंवा नंतर पैसे देण्याच्या बोलीने किंवा इतर कोणत्याही किमती मोबदल्यास. कोणत्याही विक्रेय वस्तूची केलेली विक्री, असा आहे आणि त्यामध्ये, कोणत्याही विक्रेय वस्तूचे भाडेखरेदीने किंवा हप्त्यांनी किंमत भरण्याच्या इतर कोणत्याही पद्धतीने होणारे हस्तांतरण किंवा अन्य व्यक्तीच्या वतीने अडतीसाठी (कमीशन) किंवा इतर मोबदल्यासाठी एजंटाने केलेली विक्री यांचाही समावेश होतो ;

(१६) “ अनुसूची ” याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(१७) “ विनिर्दिष्ट व्यापार ” याचा अर्थ, विनिर्दिष्ट विक्रेय वस्तूचा घाऊक व्यापार, असा आहे ;

(१८) “ घाऊक व्यापार ” याचा अर्थ, खरेदीदाराकडून केला जाणारा प्रत्यक्ष उपभोग किंवा वापर याव्यतिरिक्तच्या कारणांसाठी कोणत्याही विक्रेय वस्तूची केली जाणारी विक्री किंवा खरेदी, असा आहे आणि त्यामध्ये अशा व्यापारासाठी बाजारक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी किंवा कोणत्याही बाजारतळावर विनिर्दिष्ट विक्रेय वस्तूचा साठा करणे किंवा ती वखारीत ठेवणे

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची, नोंद (४) ४ (ब) द्वारे बॉम्बे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

याचा समावेश होईल आणि असा कोणताही विक्रेता, खरेदीदार, साठाधारक किंवा वखारवाला हा " घाऊक व्यापारी " असल्याचे समजण्यात येईल ;

(१९) या अधिनियमात वापरलेले परंतु यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना [२][मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण अधिनियम, १९७४] यामध्ये जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

## प्रकरण दोन

## बाजारक्षेत्र व बाजारतळ जाहीर करणे आणि अनधिकृत ठिकाणी व्यापार करण्यास मनाई

**३.** (१) महानगर आयुक्ताच्या शिफारशीवरून, महानगर प्राधिकरणास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तीत वर्णन केलेले महानगर प्रदेशातील कोणतेही क्षेत्र, कोणत्याही विनिर्दिष्ट विक्रेय वस्तूसाठी बाजारक्षेत्र असल्याचे जाहीर करता येईल आणि त्याच किंवा वेगळ्या अधिसूचनेद्वारे, त्या बाजारक्षेत्राकरिता एक किंवा अधिक बाजारतळ व दुय्यम बाजारतळ विनिर्दिष्ट करता येतील व हे तळ जरूर तर बाजारक्षेत्राबाहेरही असू शकतील.

(२) पोट-कलम (१) खाली कोणतीही अधिसूचना काढण्याची कोणतीही शिफारस करण्यापूर्वी महानगर आयुक्ताने, **राजपत्रात** आणि प्रस्तावित बाजारक्षेत्रामध्ये खप असणाऱ्या निदान दोन वृत्तपत्रांत एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करविली पाहिजे आणि अशा नोटिशीत वर्णन केलेल्या क्षेत्राबाबत व विक्रेय वस्तुबाबत अशी नोटीस काढण्यास प्राधिकरणाला शिफारस करण्याचा आपला इरादा असल्याचे जाहीर केले पाहिजे व **राजपत्रात** ती जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून चाळीस दिवसांत उक्त इराद्याबद्दलचे आक्षेप व सूचना पाठवण्यास सांगितले पाहिजे. महानगर आयुक्ताला जे आक्षेप व सूचना वेळेवर मिळतील त्या त्याने, प्राधिकरणाला शिफारस करण्यापूर्वी विचारात घेतल्या पाहिजेत.

(३) पोट-कलम (१) अन्वये जाहीर केल्याप्रमाणे बाजारक्षेत्राच्या चतुःसीमा आणि बाजारतळांच्या चतुःसीमा दर्शविणारा नकाशा महानगर आयुक्तांच्या कार्यालयात, बाजार समितीच्या कार्यालयात आणि या बाबतीत त्याच्याकडून अधिसूचित करण्यात येईल अशा इतर ठिकाणी पाहण्यासाठी उपलब्ध केला पाहिजे.

पहिल्या बाजार समितीची स्थापना.

**४.** (१) कलम ३, पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही विक्रेय वस्तूसाठी बाजारक्षेत्र म्हणून कोणतेही क्षेत्र जाहीर केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्यासाठी पहिल्या बाजार समितीची स्थापना केली पाहिजे. ही समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि राज्य शासनाला आवश्यक वाटतील एवढे राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेले इतर सदस्य यांची मिळून बनलेली असेल.

(२) प्रत्येक सदस्याने (अध्यक्ष व उपाध्यक्ष धरून) राज्य शासन प्रत्येक प्रकरणात निश्चित करील अशा मुदतीकरिता पद धारण केले पाहिजे.

(३) कलम ९, पोट-कलम (१) खाली रीतसर स्थापन केलेल्या व गणपूर्ती असलेल्या उत्तराधिकारी बाजार समितीची पहिली बैठक होईल तेव्हा, पहिल्या बाजार समितीच्या सर्व सदस्यांनी (अध्यक्ष व उपाध्यक्ष धरून) पद सोडले असल्याचे मानन्यात येईल.

---

२. वरील अधिनियमाची अनुसूची, नौद (४) ४ (क) द्वारे बॉम्बे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. (१) कोणत्याही विक्रेय वस्तूसाठी बाजारक्षेत्र म्हणून कोणतेही क्षेत्र जाहीर केल्यानंतर शक्य तेवढ्या लवकर, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने एक नोटीस काढली पाहिजे व ती त्या बाजारक्षेत्रात खूप असणाऱ्या निदान चार वृत्तपत्रांत प्रसिद्ध केली पाहिजे व विनिर्दिष्ट व्यापार कायदेशीरपणे करणाऱ्या सर्व व्यक्तींनी बाजार समितीकडे आपली नोंदणी करावी म्हणून त्यांच्याकडे लेखी अर्ज करण्यास त्यांना पाचारण केले पाहिजे. असे अर्ज, नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वाजवी मुदतीत मागवण्यात आले पाहिजेत. ही मुदत पंधरा दिवसांहून कमी आणि पंचेचाळीस दिवसांहून अधिक असता कामा नये. कलम ३, पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेच्या दिनांकाच्या लगतपूर्वी त्या क्षेत्रात अर्जदार, विनिर्दिष्ट व्यापार कायदेशीरपणे व सक्रियपणे करीत होते याबद्दल पुरावा प्रस्तुत करण्याबद्दल अर्जदारास सांगण्यात येईल.

(२) त्याचप्रमाणे, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या व्यक्तीव्यक्तीरिक्त, कोणत्याही बाजारतळावर विनिर्दिष्ट व्यापार करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने बाजार समितीकडे आपले नाव नोंदविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अर्ज केला पाहिजे.

(३) अशा नोंदणीकरिता करावयाचा अर्ज, मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगर आयुक्ताच्या मान्यतेसह अधिसूचित करील अशा नमुन्यात आणि अशा कागदपत्रांसह केला पाहिजे. या अर्जासोबत, उप-विधिद्वारे विहित करण्यात येईल अशी फीदेखील दिली पाहिजे.

(४) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने त्याच्याकडे आलेल्या सर्व अर्जांचा विचार केला पाहिजे. त्याला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी (तशी चौकशी करावी लागल्यास) केल्यानंतर जर त्याची अशी खात्री झाली की, कोणतेही अर्जदार विनिर्दिष्ट व्यापार कायदेशीरपणे व सक्रीयपणे करीत आहेत किंवा तसा त्यांचा इरादा आहे तर त्याने त्यांची नावे, त्याने ठेवावयाच्या नोंदवहीत समाविष्ट केली पाहिजेत. आणि त्याप्रमाणे अर्जदारांना कळविले पाहिजे. अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती कलम ३३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे लायसेन्स मिळण्यास पात्र ठरेल.

(५) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने कोणत्याही अर्जदार व्यक्तीचे नाव नोंदण्यास नकार दिला तर, त्याने अशा व्यक्तीला आपला निर्णय लेखी व कारणे देऊन कळविला पाहिजे :

परंतु, संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे नमूद करण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय या पोट-कलमाखाली कोणताही आदेश काढता येणार नाही.

(६) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची, त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून किंवा त्याने स्वतः होऊन त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर अशी खात्री झाली की, नोंदवहीतील कोणतीही नोंद चुकीची किंवा कोणत्याही तपशीलाबाबत सदोष आहे किंवा संबंधित व्यक्तीने विनिर्दिष्ट व्यापार करण्याचे बंद केल्याने ती वगळणे इष्ट आहे तर त्यास, संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर नोंद सुधारता येईल किंवा ती वगळता येईल.

(७) आपल्या नावाची नोंदणी करण्याच्या अथवा तीत सुधारणा करण्याच्या किंवा वगळण्याच्या संबंधात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला त्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून तिला कळविण्यात आल्यापासून एक महिन्याच्या आत महानगर आयुक्ताकडे लेखी अपील करता येईल.

(८) अशा नोंदणीसंबंधातील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा निर्णय आणि त्याविरुद्ध अपील

करण्यात आले असेल त्या बाबतीत, महानगर आयुक्ताचा निर्णय, अंतिम असेल.

बाजार तळातील नोंदणीकृत व्यक्तींना बाजार समितीने पर्यायी व्यापार-विषयक सोयी पुरविणे.

६. (१) प्रत्येक नोंदणीकृत व्यापाऱ्याला बाजारतळातील अआपला विनिर्दिष्ट व्यापार करणे शक्य व्हावे यासाठी, समितीला निश्चित करता येईल अशा स्वरूपाची व आकाराची आणि अशा अटींवर व शर्तीवर बाजारतळातील अशा ठिकाणी योग्य त्या पर्यायी सोयी पुरविणे बाजार समितीवर बंधनकारक असेल :

परंतु, अशा प्रकारे पुरविण्यात आलेल्या पर्यायी सोयींचा त्या बाबतीत समितीने केलेल्या वाटप आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत वापर करण्यात अशी कोणतीही व्यक्ती कसूर करील त्या बाबतीत, अशा सोयी पुरविण्याची समितीची जबाबदारी संपेल.

(२) समितीच्या कोणत्याही वाटप आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्याला असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत महानगर आयुक्ताकडे अपील करता येईल आणि अशा अपिलावरील महानगर आयुक्ताचा निर्णय ंतिम असेल :

परंतु, कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, अशा अपिलात महानगर आयुक्ताला त्याच्याविरूद्ध कोणताही आदेश काढता येणार नाही.

लायसन शिवाय कोणत्याही बाजार क्षेत्रात किंवा बाजारतळात विनिर्दिष्ट व्यापार करण्यास मनाई.

७. (१) **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे महानगर आयुक्त नियत करील अशा विनिर्दिष्ट दिनांकाला किंवा दिनांकानंतर (यात यापुढे ज्याचा " नियत केलेला दिनांक " असा निर्देश करण्यात आला आहे), कोणत्याही व्यक्तीला बाजारतळ अथवा दुय्यम बाजारतळ याखेरीज अन्यथा, आणि या अधिनियमान्वये त्या बाबतीत देण्यात आलेल्या लायसनमधील शर्तीच्या अनुसार, बाजारक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी विनिर्दिष्ट व्यापार करता येणार नाही.

(२) महानगर प्राधिकरणाने अन्यथा परवानगी दिली असेल त्याव्यतिरिक्त, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यात कोणत्याही कायद्यात कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, बाजारक्षेत्रात अधिकारिता असलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला, नियत केलेल्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर, बाजारक्षेत्रातील कोणतेही ठिकाण, बाजाराचे अथवा विनिर्दिष्ट व्यापाराचे ठिकाण म्हणून स्थापन करता येणार नाही, प्राधिकृत करता येणार नाही, चालू ठेवता येणार नाही अथवा स्थापन करण्यास, प्राधिकृत करण्यास किंवा चालू ठेवण्यास परवानगी देता येणार नाही आणि तिने पूर्वीच दिलेला कोणताही परवाना लायसन नियत केलेल्या दिनांकाला रद्द होईल.

कोणताही परवाना अथवा लायसन अशा प्रकारे रद्द झाल्यानंतर असा परवानाधारक किंवा लायसनधारक कोणत्याही नुकसानभरपाईसाठी दावा करण्यास किंवा ती मिळण्यास पात्र असणार नाही. मात्र अशा परवान्यासाठी किंवा लायसनसाठी त्याने जी फी दिली असेल त्याची जी मुदत शिल्लक असेल तिच्याशी प्रमाणशीर एवढी रक्कम मिळण्यास तो पात्र असेल.

प्रकरण तीन

## बाजार समित्यांची रचना

बाजार समित्यांची स्थापना.

८. (१) प्रत्येक बाजारक्षेत्रासाठी एक बाजार समिती असेल. प्रत्येक बाजार समिती एक निगमनिकाय असेल व महानगर प्राधिकरणाकडून ठरवण्यात येईल त्याप्रमाणे तिचे नाव ( " क्षेत्राचे व विक्रेय वस्तूचे नाव) बाजार समिती " असे असेल. प्रत्येक समितीची परंपरा अखंड असेल व तिचा एक सामायिक शिक्का असेल आणि तिला नियमनिकाय म्हणून जे नाव असेल त्या नावाने दावा लावता येईल, तसेच त्या नावाने तिच्यावर दावा लावता येईल, आणि ती स्थावर व जंगम अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्तेबाबत करार करणे, ती संपादन करणे व धारण करणे व तिचा विनियोग करणे यासाठी सक्षम असेल आणि तिला या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व गोष्टी करता येतील.

(२) मुंबई सर्वसाधारण वाक्यखंड अधिनियम, १९०४, मध्ये व्याख्या केलेल्या नाव "स्थानिक प्राधिकरण" या शब्दप्रयोगाच्या अर्थांतर्गत बाजार समिती ही, स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल. १९०४ चा मुंबई १.

बाजार समितीची रचना.

९. (१) बाजार समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) बाजारतळात विवक्षित व्यापार करण्यास विधिग्राह्य लायसन धारण करण्याऱ्या लायसन धारकांकडून निवडण्यात आलेले सहा प्रतिनिधी ;

(ख) ज्या एका किंवा अनेक विवक्षित विक्रेय वस्तूंसाठी बाजार किंवा बाजारतळ स्थापन करण्यात आला असेल त्या विक्रेय वस्तूंच्या उत्पादकांचे, या बाबतीत महानगर आयुक्ताकडून मान्यता देण्यात आलेल्या संस्थेकडून किंवा इतर कोणत्याही संघटनेकडून नामनिर्दिष्ट करण्यात आलेले दोन प्रतिनिधी नामनिर्दिष्ट केले पाहिजेत ;

परंतु, अशी कोणतीही मान्यताप्राप्त संस्था किंवा संघटना अस्तित्वात नसेल तर, महानगर आयुक्ताने उत्पादकांचे प्रतिनिधी :

(ग) बाजारक्षेत्रात महानगरपालिकेच्या कोणत्याही क्षेत्राचा कोणताही भाग अंतर्भूत असेल अथवा जर बाजारतळ कोणत्याही महानगरपालिका क्षेत्राच्या कोणत्याही भागात वसलेला असेल तर,—

(एक) अशा महानगरपालिकेचा महानगरपालिका आयुक्त, आणि

(दोन) त्या महानगरपालिकेच्या पालिका सदस्यांनी आपल्यामधून निवडलेला त्या क्षेत्राच्या महानगरपालिकेचा एक प्रतिनिधी ;

(घ) बाजारक्षेत्रात कोणत्याही नगरपालिकेच्या कोणत्याही क्षेत्राचा कोणताही भाग अंतर्भूत असेल अथवा तर बाजारतळ कोणत्याही नगरपरिषदेच्या कोणत्याही भागात वसलेला असेल तर—

(एक) अशा महानगरपरिषदेच्या मुख्य अधिकारी; आणि

(दोन) त्या महानगरपरिषदेच्या पालिका सदस्यांनी आपल्यामधून निवडलेला महानगरपालिकेचा एक प्रतिनिधी :

परंतु, बाजारक्षेत्रात एकापेक्षा अधिक नगरपरिषदेच्या क्षेत्रातील कोणतेही भाग अंतर्भूत असतील अथवा बाजारतळ एकापेक्षा अधिक नगररिषदेच्या श्रेत्राच्या कोणत्याही भागामध्ये वसलेला असेल त्या बाबतीत महानगर आयुक्ताने नामनिर्दिष्ट केलेला, नगरपरिषदेच्या एक सदस्य ;

(ङ) बाजारतळावरील विक्रेय वस्तू हाताळणाऱ्या कामगारांचा, महाराष्ट्र राज्यात कामगार आयुक्ताने मान्यता दिलेल्या अशा कामगारांच्या श्रमिक संघाने नामनिर्दिष्ट केलेला एक प्रतिनिधी :

परंतु, अशा ठिकाणी एकापेक्षा अधिक श्रमिक संघ असतील अथवा कोणताही मान्यताप्राप्त श्रमिक संघ नसेल तर कामगार आयुक्ताने प्रतिनिधीची नंमणूक केली पाहिजे.

(च) बाजारक्षेत्राच्या हद्दीत येणाऱ्या लोकसभा मतदारसंघामधून किंवा अशा मतदारसंघाच्या कोणत्याही भागातून निवडून आलेला असा, राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेला एक सदस्य ;

(छ) महानगर प्राधिकरणाचे जे सदस्य नसतील असे, बाजारक्षेत्राच्या हद्दीतील राज्य विधानमंडळाच्या मतदार संघातून किंवा अशा मतदार संघाच्या कोणत्याही भागातून निवडून आलेले, किंवा बाजारक्षेत्रात निवास करणारे, राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेले, राज्य विधानमंडळाचे दोन सदस्य ;

(ज) महाराष्ट्र राज्याचे उद्योग आयुक्त किंवा त्यांनी नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती ;

(झ) बाजारक्षेत्रात चालणाऱ्या रेल्वेच्या महाव्यवस्थापकांशी विचारविनिमय करून, महानगर आयुक्ताने नेमलेल्या रेल्वेचा एक प्रतिनिधि ;

(ञ) भारत सरकारने नामनिर्दिष्ट केलेला त्या सरकारच्या व्यापार मंत्रालयाचा एक प्रतिनिधि ;

(ट) महाराष्ट्र राज्याच्या परिवहन आयुक्ताचा एक प्रतिनिधी ;

(ठ) महानगर आयुक्ताखेरीज, प्राधिकरणाने नामनिर्दिष्ट केलेला महानगर प्राधिकरणाचा एक प्रतिनिधि ;

(ड) बाजार समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी ;

(२) जेव्हा प्रथमच बाजार समितीची रचना करण्यात येईल तेव्हा, कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, तिचे सर्व सदस्य राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केले पाहिजेत.

(३) सदस्यांना, समितीच्या किंवा स्थायी समितीच्या किंवा त्यांच्या कोणत्याही उप-समितीच्या किंवी संस्थेच्या बैठकींना उपस्थित राहताना किंवा सदस्य म्हणून कोणतीही अन्य कामे पार पाडताना करावा लागणारा वैयक्तिक खर्च भागविण्यासाठी, उप विधीद्वारे निश्चित करण्यात येतील असे भत्ते मिळतील :

परंतु—

(एक) जो संसद सदस्य आहे अशा सदस्याला देय होणारे भत्ते, त्याला देय असेल अशा, संसद (निरर्हता निवारण) अधिनियम, १९५९ मध्ये व्याख्या केलेल्या पूरक भत्त्यांपेक्षा अधिक असणार नाही. (१९५९ चा १०.)

(दोन) जो महाराष्ट्र विधानमंडळाचा (सदस्य आहे अशा सदस्याला देय होणारे भत्ते, त्याला महाराष्ट्राचा विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणार) अधिनियम १९५६ याच्या नोंद ११ अन्वये अनुज्ञेय असतील असा पूरक भत्त्यांपेक्षा अधिक असणार नाही. (१९५६ चा मुंबई ५२.)

(४) कोणतेही प्राधिकरण, समिती, संच, संघटना किंवा संस्था यांनी कोणतेही सदस्य निवडण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात कसूर केल्यास, महानगर आयुक्ताने, त्यास योग्य वाटेल असा रीतीने, त्यांना नोटीस दिली पाहिजे व त्या नोटीशाद्वारे, नोटीशीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत एक किंवा अनेक सदस्य निवडण्यास किंवा नामनिर्दिष्ट करण्यास फर्माविले पाहिजे ; आणि उपरोक्त मुदतीत एक किंवा अनेक सदस्य निवडण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात पुन्हा कसूर झाल्यास, महानगर आयुक्ताने, यथास्थिती, त्यांच्या वतीने किंवा त्याच्यापैकी कोणाच्याही वतीने पोट-कलम (१) अन्वये, यथास्थिति निवडले जाण्यास किंवा नामनिर्दिष्ट केले जाण्यास पात्र असतील अशे एक किंवा अनेक व्यक्तींची सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे.

सदस्यांच्या निवडणुका घेण्याकरिता विनियम.

१०. (१) महानगर प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीला सामान्यतः या अधिनियमान्वये घेण्यात यावयाच्या निवडणुकांशी संबंधित अशा सर्व बाबींची तरतूद करण्यासाठी किंवा त्या सर्व बाबींचे नियमन करण्यासाठी विनिमय करता येतील. कार्यकारी समितीला, विनिमय करण्याचा अधिकार, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीस अधीन राहून, वापरता येईल.

(२) पुर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणेस बाध न आणता, कार्यकारी समितीला, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात विनियम करता येतील:—

(क) निवडणुकीसाठी मतदारांच्या आणि उमेदवारांच्या अर्हता व अनर्हता ;

(ख) मतदारांची यादी तयार करणे, यी प्रसिद्ध व ती ठेवणे ;

(ग) निवडणुकीच्या निरनिराळ्या टप्प्यांसाठी दिनांक वेळ व ठिकाण निश्चित करणे ;

(घ) निवडणुकीच्या निवडणुक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर कर्मचारीवर्ग यांची नेमणूक करणे व त्यांची कर्तव्ये ;

(ङ) उमेदवारांचे नामनिर्देशन, नामनिर्देशनपत्राचा नमुना, नामनिर्देशनाच्या संबंधातील आक्षेप, नामनिर्देशनपत्राची आणि नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याच्या किंवा नाकारण्याच्या संबंधातील अपिलांची छाननी ;

(च) उमेदवारांची द्यावयाच्या अनामत रकमा ;

(छ) उमेदवारांची निवडणूक चिन्हे नेमून देणे ;

(ज) उमेदवारी मागे घेणे ;

(झ) उमेदवारांच्या प्रतिनिधींची नेमणूक ;

(ञ) मतपत्रिकेचा नमुना ;

(ट) लढविण्यात आलेल्या किंवा न लढवलेल्या निवडणुकीच्या संबंधातील कार्यपद्धती ;

(ठ) मते नोंदण्याची रीत ;

(ड) मतांची छाननी, मतमोजणी किंवा मतांची फेरमोजणी, निकाल घोषित करणे आणि समान मते पडल्यास त्यासंबंधातील कार्यपद्धती ;

(ढ) निवडणुकांच्या संबंधातील कागदपत्रांची अभिरक्षा व विल्हेवाट ;

(ण) ज्या परिस्थितीत मतदान स्थगित करता येईल किंवा नव्याने घेता येईल ती परिस्थिती ;

(त) या अधिनियमाखाली निवडणुकांच्या संबंधातील कोणतीही अन्य बाब ;

(३) (क) कार्यकारी समितीला ज्या ज्या वेळी या अधिनियमाखाली विनियम करणे इष्टे वाटेल त्यावेळी तिने विशेष बैठकीमध्ये ठराव करून अशा विनियमांचा मसुदा संमत केला पाहिजे.

(ख) असा ठराव संमत झाल्यानंतर शक्य तेवढ्या लवकर, कार्यकारी समितीने, विनियमांचा मसुदा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावला पाहिजे आणि बाजारक्षेत्रात खप असलेल्या निदान दोन वृत्तपत्रांत तसेच असा प्रकारे फलकावर लावण्यात आलेला विनियमांचा परिणाम होण्याची शक्यता असलेल्या जनतेला आणि सर्व व्यप्तींना माहिती करून देण्यासाठी तिच्या मते योग्य असेल अशा रीतीने, एक नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे आणि त्या नोटीशाद्वारे, अशा नोटीशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या वाजवी मुदतीत प्रस्तावित मसुद्याच्या संबंधातील त्यांचे आक्षेप व सूचना मागवल्या पाहिजेत.

(४) कार्यकारी समितीने तिच्याकडे आक्षेप व सूचना आल्या असल्यास त्या विचारात घेतल्या पाहिजेत आणि तिला ठरावाद्वारे विनियमांचा अंतिम मसुदा संमत करता येऊल.

(५) असा ठराव संमत झाल्यापासून सात दिवसांच्या आत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने पोट-कलम (४) अन्वये संमत केलेल्या विनियमांचा अंतिम मसुदा राज्य शासनाला सादर केला पाहिजे, आणि राज्य शासनास, त्यास आवश्यक वाटतील अशा फेरफारास तसे फेरफारास, असल्यास, अधीन राहून, त्याच्याकडे पाठवण्यात आलेले विनियम संमत करता येतील.

सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे.

**११.** महानगर आयुक्ताने कलम ९, पोट-कलम (१) अन्वये निवडण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या किंवा, यथास्थिति, नेमण्यात आलेल्या सर्व सदस्यांची नावे, **राजपत्रातील**

अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केली पाहिजेत आणि सर्व सदस्यांची नावे अशा प्रकारे प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून समितीची रचना करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, कोणत्याही कारणामुळे कोणत्याही मतदाराकडून किंवा निवडण्यास किंवा नामनिर्दिष्ट करण्यास सक्षम असलेल्या अन्य प्राधिकरणाकडून, सदस्य निवडण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात कसूर झालेली असल्यास, समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी दोन-तृतीयांश सदस्यांची नावे **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आली असतील तर, समितीची रीतसर रचना करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल, आणि त्यानंतर कलम ९, पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये निवडण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात किंवा नेमण्यात आलेल्या उर्वरित सदस्यांच्या नावांच्या बाबतीत, महानगर आयुक्ताने, त्यानंतर, ज्यावेळी सदस्य निवडण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात किंवा, यथास्थिती, नेमण्यात येईल त्यावेळी, **राजपत्रात** सदस्यांची नावे प्रसिद्ध केली पाहिजेत.

सभापती व उप सभापती धरून सदस्यांच्या निवडणुकी-संबंधातील किंवा नामनिर्देशना संबंधातील विवाद.

१२. ज्याच्या अधिकारितेत बाजारतळ असेल त्या शहर दिवाणी न्यायालयाकडे किंवा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्याकडे **राजपत्रात** सदस्यांची नावे प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत, निवडणुकीतील एखाद्या उमेदवाराने किंवा निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, सादर केलेल्या विनंतीअर्जाद्वारे असेल त्याव्यतिरिक्त, सदस्यांच्या (सभापती व उप सभापती धरून) कोणत्याही निवडणुकीबाबत आक्षेप घेता येणार नाही.

समितीच्या सदस्यांचा पदावधी.

१३. (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त (पहिल्या वेळी रचना करण्यात आलेली नसेल अशा) समितीचे सदस्य, पोट-कलम (२) मध्ये निर्देश केलेल्या दिनांकापासून चार वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करतील :

परंतु राज्य शासनास, **राजपत्रातील** आदेशाद्वारे, कोणत्याही समितीच्या सदस्यांचा पदावधी, जास्तीत जास्त एक वर्षाच्या मुदतीसाठी वाढवता येईल.

(२) समितीच्या सदस्यांचा पदावधी, पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार भरविण्यात आलेल्या समितीच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकाला सुरू झाल्याचे मानण्यात येईल.

(३) समितीची पहिली बैठक, महानगर आयुक्ताकडून, किंवा त्याने त्या बाबतीत सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, प्राधिकृत केले असेल तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून निश्चित करण्यात येईल अशा दिनांकास होईल आणि हा दिनांक सदस्यांची नावे **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या आणि कलम ११ च्या तरतुदीनुसार समितीची रचना झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आतील दिनांक असेल. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने अशा बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहिले पाहिजे.

(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विद्यमान समितीच्या सदस्यांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी अशी बैठक भरविता येणार नाही.

सदस्यांचा राजीनामा

**१४.** समितीच्या कोणत्याही सदस्यास, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे लेखी स्वरूपात आपला राजीनामा सादर करून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि असा राजीनामा, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास मिळेल तेव्हापासून, अंमलात येईल.

सदस्यांना काढून टाकणे.

१५ (१) महानगर आयुक्त यास, स्वतः होऊन किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या सल्ल्यावरून, जर कोणताही सदस्य ,—

(एक) ज्यामुळे तो सदस्य म्हणून राहू शकणार नाही अशा, कलम १० अन्वये केलेल्या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या अनर्हतापैकी कोणत्याही प्रकारे अनर्ह झाला असेल किंवा अनर्ह होईल ; किंवा

(दोन) समितीच्या किंवा तिच्याविरूद्धच्या कोणत्याही प्रकरणात, व्यावसायिकदृष्ट्या हितसंबंधित असेल किंवा त्या प्रकरणी गुंतला असेल ; किंवा

(तीन) समितीने मंजूर केलेल्या अनुपस्थितीच्या परवानगीने असेल त्याशिवाय, समितीच्या लागोपाठच्या चार बैठकींना अनुपस्थित राहील ; किंवा

(चार) महानगर आयुक्ताच्या मते, स्वतःची कर्तव्ये पार पाडण्यात हयगय केल्याबद्दल किंवा गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तनाबद्दल दोषी असेल; किंवा

(पाच) महानगर आयुक्ताच्या मते सदस्य म्हणून आपली कर्तव्ये बजावण्यास तो असमर्थ ठरला असेल;

तर, त्यास पदावरून काढून टाकता येईलः

परंतु, कोणत्याही सदस्यास, त्याच्याविरुद्ध अशी कार्यवाही का करण्यात येऊ नये याबद्दल कारणे दर्शविण्याची महानगर आयुक्तांनी त्यास वाजवी संधी दिल्याशिवाय, पदावरून काढून टाकता येणार नाही.

(२) महानगर आयुक्ताच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, महानगर आयुक्ताचा निर्णय त्यास मिळाल्याच्या दिनांकापासून, पंधरा दिवसांच्या आत, राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि राज्य शासनाने अशा अपिलावर दिलेले आदेश अंतिम असतील :

परंतु, कोणत्याही सदस्यास, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, राज्य शासनाने अपिलात कोणताही आदेश देता कामा नये.

नैमित्तिक रिकामी पदे.

१६. (१) कोणत्याही कारणावरून समितीत नैमित्तिक रिकामे होणारे सदस्याचे पद हे, ते रिकामे झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, यथास्थिती, कलम ९, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निवडणूक घेऊन किंवा नामनिर्देशन किंवा नेमणूक करून भरले पाहिजे :

परंतु, ज्या दिनांकास सदस्याचा पदावधी संपत असले त्या दिनांकाच्या लगत चार महिने अगोदरच्या मुदतीत एखादे पद रिकामे होईल तर ते पद, राज्य शासनाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, भरण्यात येणार नाही.

(२) एखादी व्यक्ती, कोणतेही पद धारण केल्यामुळे किंवा संसद, राज्य विधानमंडळ, कोणतेही स्थानिक प्राधिकरण, समिती, संघ किंवा मंडळ (मग ते संस्थापित असो वा नसो) याचा सदस्य असल्याने, समितीचा सदस्य म्हणून, निवडण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात किंवा नेमण्यात आली असेल त्याबाबतीत, त्या व्यक्तीचे उक्त पद धारण करण्याचे किंवा, यथास्थिती, ती असा सदस्य असण्याचे बंद झाल्यावर लगेच, समितीचा सदस्य असण्याचेही बंद होईल.

पदावधी संपल्यावर सदस्यांनी पद सोडणे व प्रशासकाची नेमणूक

१७. (१) कलम १३, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे समितीच्या सदस्यांचा पदावधी किंवा वाढविण्यात आलेला पदावधी संपल्यावर समितीच्या सर्व सदस्यांनी आपापली पदे सोडली पाहिजेत :

परंतु, कोणत्याही कारणास्तव, सदस्यांचा पदावधी किंवा त्यांचा वाढविण्यात आलेला पदावधी संपण्यापूर्वी कलम ११ च्या तरतुदींनुसार समितीची रचना करण्यात आली नाही तर, समितीचे अधिकार व कामे ही, समितीची अशा रीतीने रचना करण्यात येईपर्यंत, महानगर आयुक्तांनी नेमलेल्या प्रशासकाकडे निहीत होतील :

परंतु, आणखी असे की, प्रशासकाची नेमणूक तीन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीसाठी चालू राहण्याचा संभव असेल तर, महानगर आयुक्ताने अशी नेमणूक तीन महिन्यांनंतरही चालू ठेवण्यासंबंधी राज्य शासनाची मान्यता घेतली पाहिजे.

(२) प्रशासकास, राज्य शासन वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे बाजार निधीतून मासिक वेतन व भत्ते मिळतील व तो, राज्य शासन वेळोवेळी ठरवील अशी सेवा शर्तींच्या अधीन असेल. राज्य शासनाचा पगारी नोकर प्रशासक म्हणून नेमण्यात येईल तेव्हा, राज्य शासनाधीन त्याच्या सेवाशर्तीनुसार, त्याने किंवा त्याच्या वतीने, त्याचे निवृत्तिवेतन, रजा व इतर भत्ते या संबंधात जे अंशदान देणे आवश्यक असेल ते बाजार निधीमधून राज्य शासनास देण्यात आले पाहिजे.

१८. प्रत्येक समितीचा एक सभापती व एक उप सभापती असेल व कलम १० अन्वये केलेल्या विनियमानुसार समितीच्या सदस्यांकडून त्यांची निवड केली जाईल. सभापती व उप सभापती यांची निवड.

१९. सभापती व उप सभापती यांचा पदावधी हा निवड झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे किंवा सदस्य म्हणून असलेली त्यांची उर्वरित मुदत या दोहोंपैकी जी कमी असेल तितका असेल. परंतु, निवृत्त होणारा सभापती किंवा उपसभापती फेरनिवडणुकीस पात्र असेल. सभापती व उप सभापती यांचा पदावधी.

२०. समितीस, त्याबाबतीत करण्यात आलेल्या उपविधींच्या तरतुदींस अधीन राहून, उक्त उपविधीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम, मानधन म्हणून, सभापती व उप सभापती यांस देता येईल : सभापती व उप सभापतीस मानधन.

परंतु, कोणताही सभापती किंवा उप सभापती हा, संसदेचा किंवा राज्य विधानमंडळाचा सदस्य असेल तर त्यास कोणतेही मानधन देता येणार नाही. सभापती व उप सभापती यांची निवड.

२१. कलम ४, पोट-कलम (१) च्या तरतुदींस अधीन राहून, सभापती व उप सभापती हे कलम १३, पोट-कलम (३) च्या तरतुदींनुसार समितीच्या पहिल्या बैठकीत निवडले पाहिजेत. व कलम १९ अन्वये सभापती व उप सभापती यांचा पदावधी संपल्यावर किंवा, यथास्थिति, सभापती किंवा उप सभापती यांचे पद रिकामे झाले असेल त्या बाबतीत, ज्या दिनांकास, पदावधी अशा प्रकारे संपला असेल किंवा, यथास्थिती, पद रिकामे झाले असेल त्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने बोलविलेल्या समितीच्या बैठकीत सदस्यांकडून त्यांची निवड केली पाहिजे. अशा सभेत, महानगर आयुक्ताने अध्यक्ष म्हणून काम चालविले पाहिजे.

२२. सभापती किंवा उप सभापती यास, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास लेखी स्वरूपात आपला राजीनामा सादर करून त्या पदाचा राजीनामा देता येईल व उक्त राजीनामा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास तो मिळेल तेव्हापासून अंमलात येईल. सभापती व उप सभापती यांचा राजीनामा.

२३. समितीच्या एकूण सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश सदस्यांच्या बहुमताने संमत करण्यात आलेल्या ठरावाद्वारे जर समितीने सभापती किंवा उप सभापतीस काढून टाकण्याचे ठरविले तर, सभापती किंवा उप सभापती आपापली पदे धारण करण्याचे बंद होईल. सभापती व उप सभापती यांस काढून टाकणे.

२४. जर कोणत्याही करणास्तव सभापती किंवा उप सभापती यांचे पद रिक्त होईल तर, उक्त रिक्त पद हे रिक्त कलम २१ च्या तरदुदींनुसार निवडणूक घेऊन भरण्यात आले पाहिजे : सभापती व उप सभापती यांची तात्पुरती रिक्त होणारी पदे.

परंतु, अशा रीतीने निवडण्यात आलेल्या व्यक्तीने जर ती जागा रिकामी झाली नसती तर, जिच्या जागी ही व्यक्ती निवडून आली त्या व्यक्तीने जेवढा काळ पद धारण केले असते तेवढाच काळ तिने पद धारण केले पाहिजे.

२५. (१) नवीन सभापती किंवा उप सभापती यांची निवड झाल्यानंतर यथास्थिति, मावळत्या

सभापतीने किंवा उप सभापतीने आपापल्या पदाचा कार्यभार व समितीची सर्व कागदपत्रे व मालमत्ता ही यथास्थिति, नवीन सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या स्वाधीन केली पाहीजे.

सभापती व उप सभापती यांनी आपापल्या पदाचा कार्यभार स्वाधीन करणे व तो स्वाधीन करण्यास नकार दिल्यास त्याचे परिणाम.

(२) जर मावळता सभापती किंवा उप सभापती पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, आपल्या पदाचा कार्यभार व समितीची सर्व कागदपत्रे व मालमत्ता स्वाधीन करण्यात कसूर करील किंवा तसे करण्यास नकार देईल तर, महानगर आयुक्त किंवा त्याने या बाबतीत लेखी प्राधिकृत केलेला अधिकारी यास, लेखी आदेशाद्वारे, यथास्थिति, सभापती किंवा उप सभापती यास, त्याच्या पदाचा कार्यभार, असा सभापती किंवा उप सभापती म्हणून त्याच्या ताब्यात असलेली समितीची कोणतीही कागदपत्रे व मालमत्ता (असल्यास) ताबडतोब नवीन सभापती किंवा कोणतीही उप सभापती याच्या स्वाधीन करण्याबद्दल, निदेश देता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये ज्याला निदेश देण्यात आला असेल असा मावळता सभापती किंवा उप सभापती याने अशा निदेशांचे पालन केले नाही तर, महानगर आयुक्तास किंवा पोट-कलम (२) खाली त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, अशा सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या ताब्यात असलेली समितीची कागदपत्रे, निधी व मालमत्ता ही जप्त करून तिचा ताबा घेण्यासाठी म्हणून समिती, ज्यांच्या अधिकारितेत काम करीत असेल त्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(४) पोट-कलम (३) खालील अर्ज मिळाल्यानंतर, दंडाधिकाऱ्यास, फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, जेथे कागदपत्रे, निधी व मालमत्ता ठेवली असेल किंवा ठेवण्याचा संभव असेल त्या कोणत्याही जागेत प्रवेश करून त्यांचा शोध घेण्यास व ती जप्त करून यथास्थिति नवीन सभापती किंवा उप सभापती यांजकडे त्यांचा ताबा देण्यास त्यास प्राधिकृत करता येईल.

स्थायी समितीची रचना.

२६. प्रत्येक बाजार समितीसाठी एक स्थायी समिती असेल व ती पुढील पदाधिकाऱ्यांची मिळून होईल :—

(एक) समितीचा अध्यक्ष हा स्थायी समितीचाही अध्यक्ष असेल ;

(दोन) मुख्य कार्यकारी अधिकारी ; आणि

(तीन) समिती आपल्या सदस्यांमधून निवडून देईल असे इतर तीन सदस्य.

उप समित्या नेमणे.

२७. समितीला, समितीच्या एकूण सदस्यसंख्येच्या कमीत कमी निम्म्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या ठरावाद्वारे एक किंवा अधिक उप समित्या नेमता येतील ; प्रत्येक उप समितीत, समितीकडून ठरविण्यात येतील इतक्या सदस्यसंख्येचा समावेश असेल ; तथापि, प्रत्येक उप समितीची सदस्यसंख्या ही पाचपेक्षा अधिक असणार नाही.

स्थायी समिती व उप समिती यांचे अधिकार, कामे इत्यादी.

२८. समितीला, त्या प्रयोजनार्थ करण्यात आलेल्या उप-विधीद्वारे, स्थायी समितीस व उप समित्यांस आपले कोणतेही अधिकार प्रत्यायोजित करता येतील व आपली कोणतीही कामे सोपविता येतील व त्यांच्या कर्तव्यांची कक्षा ठरविता येईल :

परंतु समितीस,—

(क) कलम ४३, पोट-कलम (२) खाली ; किंवा

(ख) कलम ४४ खाली ; किंवा

(ग) कलम ६९ खाली

तिच्याकडून वापरण्यात येणारे अधिकार स्थायी समितीस किंवा कोणत्याही उप समितीस प्रत्यायोजित करता येणार नाही.

२९. कलम २८ च्या परंतुकात असेल त्याव्यतिरिक्त, त्या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, समितीस, समितीच्या एकूण सदस्यसंख्येच्या कमीत कमी निम्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या ठरावाद्वारे स्थायी समितीस किंवा उप समितीस, तिला आवश्यक वाटतील असे आपले अधिकार किंवा कर्तव्य, जास्तीत जास्त सहा महिन्यांच्या मुदतीसाठी प्रत्यायोजित करता किंवा सोपविता येतील. स्थायी समितीस किंवा उप समितीस समितीचे अधिकार प्रत्यायोजित करणे.

३०. समितीच्या स्थायी समितीच्या व उप समितीच्या बैठका गणपूर्ती व तिची कार्यपद्धती यांचे नियमन, त्या प्रयोजनार्थ केलेल्या उप-विधीनुसार करण्यात येईल. बैठकी आणि बैठकींचे कामकाज चालविणे.

३१. (१) समितीत कोणतेही पद रिक्त असताना, स्थायी समिती, किंवा कोणतीही उप समिती यातील मुदत चालू असलेल्या सदस्यांना जणू पद रिक्त नाही असे समजून काम करता येईल. पद रिक्त असताना सदस्यांनी कार्यवाही करणे, नियम बाह्यतेमुळे समिती इ. ने केलेली कामे विधिग्राह्य न ठरविणे.

(२) सभापती किंवा उप सभापती किंवा समितीचा, स्थायी समितीचा किंवा उप समितीचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची कोणतीही अनर्हता किंवा त्याची निवडणूक, नामनिर्देशन किंवा नेमणूक यातील कोणताही दोष यामुळे, समितीचे, स्थायी समितीचे किंवा उप समितीचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज हे, जर ते अन्यथा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असेल तर, निष्फळ ठरणार नाही. आणि समितीचे, स्थायी समितीचे किंवा उप समितीचे असे कामकाज हे, व्यक्तीस तसे करण्याचा अधिकार नव्हता, ती व्यक्ती बैठकीत होती किंवा बैठकीच्या कामात तिने मतदान केले किंवा अन्यथा भाग घेतला होता ही गोष्ट जरी त्यानंतर आढळून आली तरी ते विधिग्राह्य असेल, मात्र अशा व्यक्तींपैकी बहुसंख्य व्यक्तींना तसा काम करण्याचा अधिकार असला पाहिजे.

(३) समिती, स्थायी समिती किंवा तिची कोणतीही उप समिती हिचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज हे कोणत्याही सदस्यांवर नोटीस बजावण्यात कोणतीही नियमबाह्यता होती या कारणास्तव विधिअग्राह्य ठरणार नाही. मात्र तिच्या कामकाजावर अशा नियमबाह्यतेमुळे बाधक परिणाम झालेला नसावा.

(४) एतद्‌विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, समिती, स्थायी समिती किंवा कोणतीही उप समिती हिची प्रत्येक बैठक ही यथोचितरित्या बोलाविण्यात व भरविण्यात आल्याचे समजण्यात येईल.

## प्रकरण चार

## बाजार समितीचे अधिकार व कर्तव्ये

३२. या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये समितीला प्रदान करण्यात आलेले अधिकार व तिच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये याशिवाय आणखी, समितीस पुढील गोष्टी करता येतील :— बाजार समितीचे अधिकार व कर्तव्ये.

(१) कोणत्याही इमारती किंवा संरचना यांसह बाजारतळांचे बांधकाम करणे, ते सुस्थितीत राखणे आणि त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(२) अशा तळासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही उपकरणांची किंवा अवजारांची तरतूद करणे, ती सुस्थितीत राखणे आणि त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(३) कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता संपादित करणे, ती धारण करणे किंवा तिचा विनियोग करणे ;

(४) बाजार तळात विनिर्दिष्ट व्यापार चालू ठेवण्यासाठी लायसन देणे, त्यांचे नूतनीकरण करणे, ती नाकारणे, निलंबित किंवा रद्द करणे ;

(५) बाजार तळातील व्यक्तींचा प्रवेश आणि वाहनांच्या वाहतुकीचे नियमन करणे ;

(६) विक्रेय वस्तुंचे उत्पादन, त्यांची विक्री, साठवण, त्यांच्यावरील प्रक्रिया, त्यांच्या किंमती आणि त्यांची ने-आण यासंबंधीची माहिती गोळा करणे, ती तयार ठेवणे, ती प्रसृत करणे आणि पुरवणे ;

(७) लायसनधारक आणि बाजारात येणाऱ्या अन्य व्यक्ती यांच्यासाठी, वाहतूक, साठवण, प्रतवारी, वजनमाप, उपाहारगृहे, पेट्रोल पंप यांसह सामाईक सेवांची तरतूद करणे आणि बाजारास भेटी देणाऱ्या व्यक्तींसाठी तात्पुरती निवासव्यवस्था उपलब्ध करून देणे ;

(८) हा अधिनियम आणि नियम, विनियम व उप-विधी यांच्या तरतुदी आणि या अधिनियमान्वये मंजूर करण्यात आलेल्या लायसनच्या शर्ती यांची अंमलबजावणी करणे ; आणि

(९) बाजाराचे परिरक्षण किंवा त्याचे व्यवस्थापन या प्रयोजनार्थ, वेळोवेळी, आवश्यक किंवा इष्ट असतील अशी इतर कामे आणि कर्तव्ये करणे.

उपविधींद्वारे लायसनच्या मंजुरीचे नियमन करणे.

३३. राज्य शासनाकडून करण्यात आलेल्या कोणत्याही नियमास अधीन राहून, समितीस, विनिर्दिष्ट व्यापार करण्यासाठी बाजारतळातील कोणत्याही जागेचा वापर करण्यासाठी लायसन देणे, त्याचे नूतनीकरण करणे, ते निलंबित किंवा रद्द करणे यासाठी उप-विधी करता येतील :

परंतु,—

(एक) कोणतेही लायसन मंजूर करणारे, त्याचे नूतनीकरण करणारे, ते देण्यास किंवा त्यांचे नूतनीकरण करण्यास नकार देणारे, ते रद्द किंवा निलंबित करणारे सर्व आदेश हे लेखी असले पाहिजेत आणि लायसन देण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास नकार देणारा किंवा ते रद्द अथवा निलंबित करणारा कोणताही आदेश हा, संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, काढता येणार नाही ;

(दोन) लायसन अशा प्रकारे नाकारणे, रद्द किंवा निलंबित करणे यासंबंधीच्या कारणांची लेखी नोंद केली पाहिजे ;

(तीन) समिती कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीला प्रारंभिक लायसन देण्यास नकार देणार नाही.

फी बसविण्याचा समितीचा अधिकार.

३४. समिती,—

(एक) कलम ३५, पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, गाळे, कार्यालये, दुकाने, गोदामे इत्यादी आणि बाजारतळातील मोकळ्या जागा यासाठी ;

(दोन) समितीद्वारे तरतूद करण्यात आलेल्या अथवा व्यवस्था करण्यात आलेल्या कोणत्याही सामाईक सेवा, सुविधा आणि सुखसोयी यासाठी ;

(तीन) व्यक्ती, वाहने आणि माल यांना बाजारतळात प्रवेश देण्यासाठी ; आणि

(चार) जिच्या बाबतीत समितीकडून फी बसविण्यात यावयाची असेल अथवा बसविता व गोळा करता येईल अशा कोणत्याही बाबीसाठी,

करण्यात आलेल्या उप-विधींमध्ये चालून दिलेल्या रीतीने आणि दराने, फी बसविण्यात आणि ती वसून करण्यास सक्षम असेल.

**३५.** (१) कलम ३२, खंड (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, समितीस, राज्य शासनाच्या परवानगीने असेल त्याशिवाय, तिच्याकडे निहित असलेल्या किंवा तिने संपादन केलेल्या व बाजारतळात असलेल्या कोणत्याही जमिनींची विक्री करून ती भाडे पट्ट्याने देऊन, तिची अदलाबदल करून, ती गहाण ठेवून किंवा अन्यथा तिचे हस्तांरतण करता येणार नाही. समितीच्या स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधी तरतूद.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींस अधीन राहून, समितीस, कोणतीही इमारत, गाळा, दुकान स्टँड, कोंडवाडा किंवा जमिनीशी संलग्न किंवा जमिनीशी संलग्न अशा कोणत्याही गोष्टींशी कायम जखडलेली वस्तू हिचा (कोणतीही इमारत, गाळा, दुकान, स्टँड, कोंडवाडा किंवा जमिनीशी संलग्न किंवा जमिनीशी संलग्न अशा कोणत्याही गोष्टींशी कायम जखडलेली वस्तू यांचा वापर व भोगवटा याबद्दलची फी किंवा भाडे किंवा नुकसान भरपाई धरून) त्या प्रयोजनार्थ केलेल्या उप-विधीद्वारे ठरविण्यात येतील अशा शर्ती व निर्बंध यांस अधीन राहून, तिची विक्री करून, ती भाडे पट्ट्याने देऊन, तिची अदलाबदल करून, ती गहाण ठेवून किंवा अन्य रीतीने, विनियोग करता येईल.

३६. (१) उप-विधीत तरतूद करण्यात येतील अशा शर्तीस व निर्बंधास अधीन राहून, कलम ३५, पोट-कलम (२) अन्वये त्याला देण्यात आलेली स्थावर मालमत्ता धारण करणाऱ्या किंवा अशा मालमत्तेत कोणताही हितसंबंध असणाऱ्या, कोणत्याही लायसनधारकास, समितीच्या पूर्वमंजुरीने अशी मालमत्ता किंवा हितसंबंध, करार करून, विनिर्दिष्ट धंदा करण्यासाठी म्हणून, कोणत्याही व्यक्तींकडे हस्तांतरित करता येईल. लायसन धारकांकडून समितीच्या स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण.

(२) समितीस, त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून, अशा हस्तांतरणास नकार देता येईल :

परंतु, अशा मंजुरीस नकार देणारा कोणताही आदेश, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, देता येणार नाही.

परंतु आणखी असे की, समितीने जर कोणताही निर्णय घेतला नाही आणि अशा हस्तांतरणाचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अर्जदारास तसे, टपालदाखला घेऊन पत्राद्वारे कळवले नाही तर, ते हस्तांतरण मंजूर झाल्याचे मानण्यात येईल.

(३) समितीच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्यासंबंधात, समितीकडून सूचना मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत, महानगर आयुक्तांकडे अपील करता येईल व त्यासंबंधी आयुक्ताचा अशा अपिलावरील निर्णय अंतिम असेल.

३७. (१) समितीने केलेली प्रत्येक संविदा ही, लेखी असेल व तीवर सभापतीने किंवा सभापती अनुपस्थित असल्यास, उप सभापतींने व समितीच्या इतर सदस्यांनी समितीच्या वतीने सह्या केल्या असतील. संविदा करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या संविदेखेरीज, कोणतीही संविदा ही, समितीवर बंधनकारक असणार नाही.

## प्रकरण पाच

## बाजार निधी, वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा, वगैरे

बाजार निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक.

**३८.** (१) या अधिनियमान्वये देण्यात आलेली लायसन फी किंवा लादण्यात आलेला द्रव्य दंड, शास्ती (कोणत्याही न्यायालयाने लादलेल्या द्रव्य दंडाव्यतिरिक्त), समितीने विक्री केलेल्या जमिनीचे व इतर मालमत्तेचे सर्व उत्पन्न, जमीन किंवा मालमत्ता यांपासून मिळणारे भाडे किंवा नुकसान भरपाई समितीने उभारलेली सर्व कर्जे व राज्य शासनाने समितीस दिलेली अनुदाने, कर्जे किंवा अंशदानेधरून, या अधिनियमान्वये समितीला मिळालेला सर्व पैसा हा ' बाजार ' निधी या नावाने संबोधण्यात येणाऱ्या निधीचा भाग बनेल.

(२) बाजार निधीच्या खात्यातील रक्कम विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवण्यात किंवा गुंतविण्यात येईल.

ज्या प्रयोजनांसाठी बाजार, निधीतून खर्च करावयाचा ती प्रयोजने.

**३९.** (१) पुढील प्रयोजनांसाठी बाजार निधीतून खर्च करण्यात येईल :—

(क) बाजारासाठी एक किंवा अनेक जागा संपादन करणे ;

(ख) बाजाराचे परिरक्षण, विकास व सुधारणा ;

(ग) अशा बाजाराच्या प्रयोजनासाठी आवश्यक अशा इमारती बांधणे व बाजाराचा वापर करणाऱ्या व्यक्तीचे आरोग्य व सुरक्षितता यासाठी त्यांची दुरुस्ती करणे ;

(घ) बाजाराचा वापर करणाऱ्या व्यक्तींसाठी सामाईक सेवा, सुविधा व सुखसोयी यांची तरतूद करणे ;

(ङ) समितीने नेमलेल्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तिवेतन, रजा व इतर भत्ते, उपदाने, अपघातातून होणाऱ्या दुखापतीबद्दल नुकसान भरपाई, अनुकंपा भत्ता व रजा भत्ता, निवृत्तिवेतन आणि भविष्यनिर्वाह निधी यांसाठी अंशदाने ;

(च) समिती, स्थायी समिती व उप समिती यांच्या सदस्यांना भत्ते व प्रवास खर्च देणे ;

(छ) सभापती व उपसभापती यांना मानधन देणे ;

(ज) सभापतीने उभारलेले कर्ज असल्यास, त्यावरील व्याज देणे व अशा कर्जासंबंधीच्या कर्ज निवारण निधीची तरतूद करणे ;

(झ) विक्रेय वस्तूचे उत्पादन, विक्री, खरेदी, साठा, प्रक्रिया, त्यांच्या किमती व त्यांची ने-आण इत्यादी बाबतीत माहिती गोळा करणे व ती प्रसृत करणे ;

(ञ) कलम ४२ अन्वये लेखापरीक्षेचा खर्च केला असल्यास तो खर्च ;

(ट) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये घालून दिलेली इतर कामे पार पाडणे ;

(ठ) राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने अन्य कोणतीही प्रयोजने.

(२) समितीनेही, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, बाजारातळाबाहेरील बांधकामावर किंवा संच मांडणीवर खर्च करणे कायदेशीर असेल. मात्र, असा प्रस्ताव हा, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्याच्या उद्दिष्टास पूरक असला पाहिजे आणि त्या प्रस्तावास समितीच्या एकूण सदस्यांपैकी निम्म्या सदस्यांनी मान्यता दिली पाहिजे.

**४०.** (१) कलम ३८, पोट-कलम (२) अन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, त्या प्रयोजनार्थ केलेल्या उप-विधींद्वारे, विशेष निधी स्थापन करता येईल आणि अशा निधींमध्ये, अशा उप-विधींद्वारे ठरविण्यात येईल असा बाजार निधीचा हिस्सा जमा करता येईल. अशा विशेष निधींमध्ये पुढील निधींचा समावेश होऊ शकेल :— विशेष निधींची रचना.

(एक) घसारा निधी ;

(दोन) भविष्यनिर्वाह निधी ;

(तीन) निवृत्तिवेतन निधी ;

(चार) कर्मचारी कल्याण निधी ;

(पाच) सर्वसाधारण राखीव निधी.

(२) असा प्रत्येक निधी हा बाजार निधीचा एक भाग असेल आणि तो समितीने धारण केला पाहिजे व ज्या प्रयोजनासाठी तो स्थापन करण्यात आला असेल त्यासाठी त्याचा समितीने विनियोग केला पाहीजे.

**४१.** समितीस, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी किंवा तिने घेतलेल्या कोणत्याही कर्जाच्या व्यवस्थापनासाठी राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, या अधिनियमान्वये समितीकडे निहित असलेल्या किंवा समितीने संपादन करण्याचे ठरविलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या तारणावर, राज्य शासन त्या त्या वेळी ठरवील अशा दराने व अशा शर्तीवर, कोणतीही रक्कम उसनी घेता येईल. पैसे उसने घेण्याचा अधिकार.

**४२.** (१) समितीने, तिने यासंबंधात केलेल्या उप-विधींद्वारे ठरविलेल्या नमुन्यात व ठरविलेल्या पद्धतीने लेखे ठेवले पाहिजेत. लेखे व लेखापरीक्षा.

(२) समितीचे लेखे, मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी तपासले पाहिजेत किंवा समितीने राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने नेमलेल्या एखाद्या अन्य लेखापरीक्षकाने तपासले पाहिजेत.

(३) राज्य शासनास, त्यास योग्य वाटल्यास, समितीचे लेखे तपासण्यासाठी विशेष लेखापरीक्षकाची नेमणूक करता येईल.

(४) लेखापरीक्षकाने किंवा यथास्थिती, विशेष लेखापरीक्षकाने त्याचा अहवाल समितीला सादर केला पाहिजे आणि त्याची एकेक प्रत महानगर आयुक्ताला व राज्य शासनाला पाठविली पाहीजे.

(५) पोट-कलम (२) किंवा (३) खालील लेखापरीक्षेचा खर्च, असल्यास, तो खर्च समितीने केला पाहीजे.

**४३.** (१) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दरवर्षी, समिती त्या संदर्भात केलेल्या उप-विधीद्वारे ठरवील अशा नमुन्यात, पुढील आगामी वित्तीय वर्षाच्या संबंधातील वार्षिक अर्थसंकल्प तयार केला पाहिजे आणि त्यात, समितीच्या अंदाजित जमा व संवितरित रकमा किंवा उत्पन्न व खर्च, व्यापार निधीची अंदाजित प्रारंभिक व अखेरची शिल्लक असल्यास, ती शिल्लक दर्शविली पाहिजे आणि तो अर्थसंकल्प, समितीकडे जानेवारीच्या एकतीस दिनांकापूर्वी मान्यतेसाठी सादर केला पाहिजे. अर्थसंकल्प.

(२) समितीने, तिला आवश्यक वाटतील असे फेरफार करून तो अर्थसंकल्प १ मार्चपर्यंत अंगीकारला पाहिजे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, त्याने तयार केलेल्या अर्थसंकल्पाच्या व समितीने मान्य केलेल्या अर्थसंकल्पाच्या प्रती पाच मार्चपूर्वी महानगर आयुक्ताकडे त्याच्या मान्यतेसाठी पाठविल्या पाहिजेत.

(४) समितीने जर, कोणत्याही कारणासाठी १ मार्चपर्यंत अर्थसंकल्प अंगीकारण्यात कसूर केली तर, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, त्याने तयार केलेला अर्थसंकल्प महानगर आयुक्ताना मान्यतेसाठी ५ मार्चपूर्वी सादर केला पाहिजे.

(५) महानगर आयुक्ताने, त्यांना आवश्यक वाटतील अशा फेरफारांसह तो अर्थसंकल्प ३१ मार्चपूर्वी संमत केला पाहिजे.

(६) संमत झालेल्या अर्थसंकल्पाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने राज्य शासनाकडे पाठविली पाहीजे.

अर्थसंकल्पीय तरतुदींचे पुनर्विनियोजन.

**४४.** समितीने, उप-विधी असल्यास, त्या उप-विधीच्या अधीन राहून, कलम ४३ अन्वये मान्य केलेल्या अर्थसंकल्पांतर्गत पुनर्विनियोजनास मंजुरी दिली पाहीजे. अशा पुनर्विनियोजनाच्या विवरणाची एक प्रत महानगर आयुक्तांना व राज्य शासनाला सादर केली पाहीजे :

परंतु, कोणत्याही कर्जाची परतफेड करण्यासाठी किंवा कोणत्याही कर्जावरील व्याज चुकते करण्यासाठी आणि कलम ४० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही निधीचे वा निधींचे अंशदान भरण्यासाठी राखून ठेवलेल्या रकमांच्या बाबतीत असे पुनर्विनियोजन करता येणार नाही.

मालमत्ता व निधी इत्यादींचा विनियोग.

**४५.** समितीच्या मालकीची असलेली किंवा समितीकडे निहित असलेली सर्व मालमत्ता व बाजार निधी आणि इतर सर्व मत्ता ही, समितीने, या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून त्यांच्या प्रयोजनार्थ धारण केली पाहिजे आणि तिचा विनियोग केला पाहिजे.

वार्षिक अहवाल.

**४६.** (१) समितीने, दरवर्षी वार्षिक अहवाल तयार करण्याची व्यवस्था केली पाहिजे व त्यात पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

(एक) मागील वर्षीच्या जमा रकमा व वितरित रकमा यांचे विवरण ;

(दोन) मागील वर्षात कलम ४० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या बाजार निधीतील तसेच विशेष निधी असल्यास त्यातील पैशांच्या व्यवहारांचे विवरण ; आणि

(तीन) मागील वर्षातील समितीच्या कामांचा अहवाल ; आणि हा अहवाल ३० जूनपूर्वी महानगर आयुक्तामार्फत राज्य शासनाला सादर केला पाहिजे.

(२) हा वार्षिक अहवाल, शक्यतो तो ज्या वर्षासंबंधी असेल त्याच्या लगतनंतरचे वर्ष संपण्यापूर्वी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडला पाहिजे.

## प्रकरण सहा

## **जमिनीचे संपादन**

सन १९७५ चा महाराष्ट्र क्रमांक ४ याच्या प्रकरण आठ च्या तरतुदी लागू असणे.

**४७.** (१) राज्य सासनाने या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ केलेले कोणत्याही जमिनीचे संपादन हे सार्वजनिक प्रयोजन म्हणून मानण्यात येईल.

(२) [1][मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४] याच्या प्रकरण आठ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, त्या जशा त्या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासनाने संपादित केलेल्या जमिनीच्या बाबतीत लागू होतात त्याचप्रमाणे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ संपादन केलेल्या कोणत्याही जमिनींच्या संबंधात लागू होतील. सन १९७५ चा महा. ४.

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची, नोंद (४) २(अ) (दोन) द्वारे ' बॉम्बे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण सात

## बाजार समितीचे अधिकारी व सेवक

**४८.** (१) प्रत्येक समितीसाठी एक मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि त्याची नेमणूक राज्य शासनाने केली पाहिजे.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक.

(२) प्रत्येक मुख्य कार्यकारी अधिकारी हा,—

(एक) समितीच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर आलेला राज्य शासनाचा अधिकारी असेल ;

(दोन) त्यास, राज्य शासन वेळोवेळी ठरवील इतके वेतन व भत्ते आणि परिलब्धी देण्यात येईल ;

(तीन) तो, राज्य शासन ठरवील अशा सेवेच्या अटी व शर्तींच्या अधीन असेल ; आणि

(चार) त्याची राज्य शासन बदली करू शकेल.

(३) राज्य शासनाच्या अधिकाऱ्याची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक झाल्यानंतर, त्याच्या शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेच्या शर्तीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे, त्याने किंवा त्याच्या वतीने देय असलेले निवृत्तिवेतनासंबंधीचे अंशदान आणि रजा व इतर भत्ते यासंबंधीचे अंशदान हे बाजार निधीमधून राज्य शासनास दिले पाहिजे.

(४) समितीच्या एखाद्या विशेष बैठीत, समितीच्या कोणत्याही बैठकीत उपस्थित राहण्याचा व मत देण्याचा त्या वेळेपुरता हक्क असलेल्या सदस्यांच्या (मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याखेरीज) एकूण संख्यापैकी कमीत कमी दोन-तृतीयांश सदस्यांनी जर, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास पदावरून दूर करण्यास राज्य शासनास भाग पाडणाऱ्या ठरावाच्या बाजूने मते दिली तर, राज्य शासनाने अशा अधिकाऱ्यास समितीच्या सेवेतून काढून टाकले पाहिजे.

**४९.** (१) समितीच्या पर्यवेक्षणास, निदेशनात व नियंत्रणात अधीन राहून, समितीची सर्व कार्यकारी कामे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने पार पाडली पाहिजेत.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींस बाध न आणता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने,—

(एक) समितीच्या वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर देखरेख ठेवली पाहिजे आणि या अधिनियमान्वये किंवा नियमांन्वये, विनियमांद्वारे किंवा उपविधींद्वारे त्याला प्रदान करण्यात आलेल्या किंवा त्याच्यावर लादलेल्या किंवा समितीने या अधिनियमन्वये त्याच्याकडे सोपविलेल्या अधिकारांचा वापर केला पाहिजे व अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत ;

(दोन) समितीच्या सर्व अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवले पाहिजे ;

(तीन) समितीला येणे असलेल्या सर्व रकमांच्या वसुलीबाबत व समितीने देणे असलेल्या सर्व रकमांच्या परतफेडीबाबत जबाबदार राहिले पाहिजे ;

(चार) समितीच्या सर्व मत्तेच्या व मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी पुरेशी व्यवस्था केली पाहिजे ;

(पाच) या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या, विनियमांच्या किंवा उपविधींच्या तरतुदींनुसार बाजार निधीचा व मालमत्तेचा योग्य प्रकारे विनियोग होण्यास जबाबदार राहिले पाहिजे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला, समितीच्या संमतीने, त्याला या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या वा त्याजवर लादलेल्या अधिकारांपैकी किंवा कर्तव्यांपैकी किंवा कामांपैकी कोणतेही अधिकार, कर्तव्ये वा कामे, समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे वा कर्मचाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

अन्य अधिकाऱ्यांची व सेवकांची नेमणूक.

**५०.** (१) समितीला,—

(क) वेळोवेळी, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यापेक्षा दुय्यम दर्जाच्या इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करता येतील;

(ख) वेळोवेळी, अशी पदे धारण करण्यासाठी अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल ; आणि

(ग) अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी ती ठरवील असे वेतन, भत्ते व इतर परिलब्धी देता येतील ;

परंतु, महानगर आयुक्ताच्या पूर्वमान्यतेशिवाय, समितीला, दरमहा किमान एक हजार रुपयांपेक्षा अधिक असलेल्या वेतनश्रेणीतील कोणतेही पद निर्माण करता येणार नाही.

(२) अशा अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे अधिकार व कामे ही समितीला, त्या प्रयोजनासाठी वेळोवेळी करण्यात आलेल्या उप-विधींद्वारे निश्चित करता येतील.

अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या सेवाशर्तींचे उप-विधींद्वारे नियमन करणे.

**५१.** समितीला, त्या प्रयोजनासाठी करण्यात आलेल्या उप-विधींद्वारे आपल्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा सेवाप्रवेश व त्यांच्या सेवाशर्ती यांचे नियमन करता येईल आणि अशा उप-विधींमध्ये पुढील बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(एक) रजा मंजुरी व रजेवरील अनुपस्थितीच्या काळातील रजा वेतन व भत्ते यांचे प्रदान या गोष्टींचे नियमन करणे ;

(दोन) प्रवास भत्ता किंवा वाहन भत्ता देण्यास प्राधिकृत करणे ;

(तीन) सेवावधीचे नियमन करणे ;

(चार) ज्या शर्तीन्वये कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन, उपदान अथवा अनुकंपा भत्ता मिळेल अथवा ज्याअन्वये त्यांच्या वारसांना अथवा उत्तरजीवी नातेवाइकांना असे निवृत्तीवेतन, उपदान अथवा अनुकंपा भत्ता मिळेल त्या शर्ती निश्चित करणे ;

(पाच) कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी स्थपान करण्यात येणाऱ्या कोणत्याही निवृत्तिवेतनासाठी किंवा भविष्यनिर्वाह निधीला अंशदान देण्यासाठी बाजार निधीतून रकमा देण्यास प्राधिकृत करणे ;

(सहा) एखाद्या कर्मचाऱ्याची चौकशी चालू असताना तो निलंबित असतानाच्या कालावधीत, वेतनाऐवजी निर्वाह भत्त्याची रक्कम निश्चित करणे ;

(सात) कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही इतर सेवाशर्ती सर्वसाधारणपणे विहित करणे.

## प्रकरण आठ

## नियंत्रण

**५२.** (१) महानगर आयुक्तास, किंवा त्याने सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे या बाबतीत प्राधीकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास पुढील गोष्टी करता येतील :— तपासणी, चौकशी, विवरणपत्रे इत्यादी सादर करणे.

(क) बाजार समित्यांचे, बाजारतळाचे आणि समितीकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या कोणत्याही इतर आस्थापनेचे लेखे व त्यांची कार्यालये यांची तपासणी करणे किंवा तपासणी करविणे ;

(ख) समितीच्या व्यवहारांची चौकशी करणे ;

(ग) अशा समितीने जे सादर करणे आवश्यक आहे असे त्यास वाटेल असे कोणतेही विवरण, निवेदन, लेखे अथवा अहवाल मागविणे ;

(घ) समितीची कार्यवृत्ते मागविणे व त्यांची तपासणी करणे ;

(ङ) समितीस,—

(एक) अशा समितीकडून किंवा तिच्यावतीने जी कोणतीही गोष्ट केली जाणार असेल किंवा करण्यात येत असेल ती करण्याविरूद्ध जी कोणतीही हरकत आहे असे त्यास वाटत असेल अशी कोणतीही हरकत विचारात घेण्यास सांगणे आणि अशी गोष्ट करण्यासाठीची आपली कारणे विनिर्दिष्ट किंवा वाजवी वेळेत लेखी स्वरूपात देण्यास सांगणे ; किंवा

(दोन) तो पुरवू शकेल अशा ज्या कोणत्याही माहितीमुळे अशा समितीने विविक्षित गोष्टी करणे आवश्यक आहे असे त्यास वाटत असेल अशी कोणतीही माहिती विचारात घेण्यास सांगणे आणि अशी गोष्ट न करण्याबद्दलची आपली कारणे विनिर्दिष्ट किंवा वाजवी वेळेत लेखी स्वरूपात देण्यास सांगणे ; आणि

(च) उत्तराचा विचार चालू असताना, जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा करण्यात येत असेल अशी कोणतीही गोष्ट केली जाऊ नये आणि जी कोणतीही गोष्ट, त्याच्याकडून निदेश देण्यात येईल अशा मुदतीच्या आत करण्यात आली पाहिजे, परंतु ती केली जात नसेल अशी कोणतीही गोष्ट करण्यात यावी याबद्दल निदेश देणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशांचे किंवा काढलेल्या निदेशांचे पालन करण्यात समिती कसूर करील त्या बाबतीत, महानगर आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास अशा आदेशाचे पालन करण्याचा निदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला देता येईल आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने अशा निदेशाचे तात्काळ पालन केले पाहिजे.

**५३.** (१) महानगर आयुक्ताने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने अथवा यथास्थिति, राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने, त्याला तसे करण्यास फर्मावले तर (सभापती व उप सभापती धरून) समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, कर्मचाऱ्याने अथवा सदस्याने समितीच्या, स्थायी समितीच्या अथवा कोणत्याही उप समितीच्या व्यवहाराबाबत किंवा कामकाजाबाबत, त्याच्या ताब्यात असलेली माहिती पुरविली पाहिजे. अधिकारी, सेवक अथवा सदस्य यांचे महानगर आयुक्त इत्यादींस माहिती पुरविण्याचे कर्तव्य.

(२) कलम ५२ अन्वये समितीच्या व्यवहाराची चौकशी करणाऱ्या किंवा कामकाजाची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यास, दिवाणी प्रक्रिया संहितां, १९०८ द्वारे दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत तरतूद केलेल्या उपायांनी व शक्य होईल तेथवर त्याच रीतीने, समितीच्या सभापती व उप सभापतीसह तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कर्मचाऱ्यास किंवा सदस्यास बोलावण्याचे व हजर करून साक्ष देण्यास व दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडण्याचे अधिकार असतील. त्यानंतर उक्त अधिकाऱ्यांने अशा रीतीने केलेल्या चौकशीचा किंवा तपासणीचा अहवाल राज्य शासनाला सादर केली पाहिजे. १९०८ चा ५.

लेखा पुस्तके व इतर दस्तऐवज इत्यादी जप्त करणे.

**५४.** ज्या बाबतीत, महानगर आयुक्तास अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास समितीची पुस्तके व अभिलेख यात अनधिकृतरीत्या फिरवाफिरव होण्याचा संभव आहे किंवा समितीचे निधी किंवा मालमत्ता यांचा दुर्विनियोग किंवा अपयोजन होण्याचा संभव आहे, असे समजण्यास वाजवी कारण आहे असे वाटले तर, महानगर आयुक्तास किंवा त्याने अशा प्रकारे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास समितीची अशी पुस्तके व अभिलेख, निधी व मालमत्ता जप्त करता येईल व त्यांचा ताबा घेता येईल, आणि अशा पुस्तकांच्या, अभिलेखाच्या, निधींच्या व मालमत्तांच्या अभिरक्षेस जबाबदार असलेल्या (सभापती व उप सभापती धरून) समितीच्या अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी अथवा सदस्यांनी अशी पुस्तके अभिलेख निधी आणि मालमत्ता इत्यादी महानगर आयुक्त अथवा त्याने अशा प्रकारे प्राधिकृत केलेला अधिकारी याच्या स्वाधीन केली पाहिजेत.

बाजार समिती निष्प्रभावित करणे.

**५५.** (१) जर राज्य शासनाच्या मते,—

(एक) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याने समितीवर सोपवण्यात आलेली कामे पार पाडण्यास समिती सक्षम नसेल ; किंवा

(दोन) अशी कर्तव्ये पार पाडण्यात अथवा राज्य शासन, प्राधिकरण, महानगर आयुक्त अथवा राज्य शासनाने किंवा महानगर आयुक्ताने अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याने (समितीच्या लेख्यांच्या लेखापरीक्षा किंवा तिच्या कार्यालयीन कामांची तपासणी यामधून उद्‌भवणारे कायदेशीर निदेश धरून) दिलेले कायदेशीर निदेश अथवा आदेश यांचे पालन करण्यात ती कसूर करील ; अथवा

(तीन) ती आपल्या अधिकारांचे अधिक्रमण करील किंवा त्यांचा दुरूपयोग करील ; अथवा

(चार) समितीची अर्थिक स्थिती व पत यास गंभीररीत्या धोका निर्माण झाला असेल ; किंवा

(पाच) कोणत्याही इतर कारणावरून राज्य शासनाला तसे करणे आवश्यक किंवा इष्ट वाटेल तर, राज्य शासनाला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे स्वतः होऊन किंवा प्राधिकाऱ्याच्या शिफारशीवरून, समितीला निष्प्रभावित करता येईल :

परंतु, समितीला स्पष्टीकरण देण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज राज्य शासनाला असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश प्रसिद्ध करण्यास आल्यावर पुढील परिणाम होतील :—

(एक) सभापती व उप सभापती यांसह सर्व सदस्यांनी, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून, आपले पद रिकामे केले असल्याचे समजण्यात येईल ;

(दोन) सभापतीने व उप सभापतीने आपापल्या पदाचा प्रभार आणि समितीची सर्व कागदपत्रे व मालमत्ता, कलम ५६ अन्वये नेमण्यात आलेल्या प्रशासकाकडे ताबडतोब सुपूर्द केली पाहिजे आणि योग्य त्या फेरफारांसह कलम २५ च्या तरतुदी, या कलमाखालील पदाचा प्रभार आणि समितीची कागदपत्रे व मालमत्ता सुपूर्द करण्याबाबत लागू असतील ;

(तीन) समितीकडे निहित असलेली सर्व मालमत्ता राज्य सासनाकडे निहित होईल.

**५६.** (१) जेव्हा समिती निष्प्रभावित करण्यात येईल, तेव्हा, राज्य शासनाला, कलम ५५ च्या पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या त्याच आदेशाद्वारे अथवा तत्सम आदेशाद्वारे, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक वर्षाच्या मुदतीसाठी पहिल्यांदा प्रशासक नेमता येईल, परंतु, राज्य शासनाला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याच्या पदाची मुदत एकूण तीन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या एक किंवा अधिक मुदतीने वाढवता येईल. प्रशासकाची नेमणूक.

(२) प्रशासकास, बाजार निधींमधून राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन व भत्ते मिळतील आणि तो अशा निर्धारित केलेल्या अशा सेवा शर्तींच्या अधीन राहील. राज्य शासनाच्या वेतनी कर्मचाऱ्याची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आल्यास, राज्य शासनाकडील त्याच्या सेवेच्या शर्तीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे, त्याने किंवा त्याच्या वतीने करावयाचे, निवृत्तिवेतनासंबंधीचे आणि रजा व इतर भत्ते यासंबंधीचे अंशदान बाजार निधीमधून राज्य शासनास प्रदान केले पाहिजे.

**५७.** (१) कलम ५६ अन्वये कोणत्याही प्रशासकाची नेमणूक करण्यात येईल तेव्हा त्याच्या पदावधीत, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याद्वारे, समिती, स्थायी समिती, सभापती, उप सभापती आणि कोणत्याही असल्यास उप समित्या यांच्याकडे निहित असलेले किंवा त्यांना वापरता येतील असे अधिकार आणि त्यांच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये आणि कामे ही प्रशासकाकडे निहित होतील आणि त्याच्याकडून त्यांचा वापर करण्यात आला पाहिजे किंवा, यथास्थिति, ती पार पाडण्यात आली पाहिजेत. प्रशासकाचे अधिकार.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासकाच्या हाताखाली काम करील आणि प्रशासकास, त्यास आवश्यक वाटतील असे अधिकार आणि अशी कर्तव्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

**५८.** (१) प्रशासकाची मुदत किंवा वाढीव मुदत समाप्त होण्यापूर्वी एक महिन्याच्या आत सदस्यांना निवडण्यासाठी निवडणूक घेतली पाहिजे किंवा कलमे ९ आणि ११ च्या तरतुदीनुसार समितीची पुनःस्थापना व रचना करता यावी यासाठी सदस्यांना नामनिर्देशित करण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे. समितीची पुनःस्थापना.

(२) कलम ५६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्राशासकाच्या पदाची मुदत ही, अशा प्रकारे पुनःस्थापित व रचना केलेल्या समितीच्या पहिल्या बैठकीच्या लगतूर्वीच्या दिनांकापर्यंत वाढवल्याचे व त्या दिनांकास ती समाप्त झाल्याचे समजण्यात येईल.

## प्रकरण नऊ

## अपिले व पुनरीक्षण

अपिले. **५९.** (१) कलम ५, कलम ६, कलम १५ चे पोट-कलम (२) यामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, आणि कलम ६० च्या तरतुदींस अधीन राहून, हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम, विनियम किंवा उप-विधी याखाली देण्यात आलेल्या प्रत्येक मूळ आदेशाविरूद्धचे अपील, हे,——

(एक) जर तो आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याखेरीज अन्य अधिकाऱ्याने काढला असेल तर, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे ;

(दोन) जर (अपिलात केलेल्या आदेशाखेरीज) तो आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने काढला असेल तर, स्थायी समितीकडे ;

(तीन) जर (अपिलात केलेल्या आदेशाखेरीज) तो आदेश स्थायी समितीने काढला असेल तर, समितीकडे ;

(चार) जर तो आदेश समितीने काढला असेल तर, महानगर आयुक्ताकडे दाखल करता येईल.

(२) समितीने अपिलात दिलेल्या आदेशाच्या प्रकरणी, महानगर आयुक्ताकडे दुसरे अपील दाखल करता येईल.

(३) कोणतेही अपील किंवा दुसरे अपील हे आदेशाविरूद्ध अपील दाखल करण्यात आले असेल तो आदेश अर्जदाराला प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत करण्यात आले नसेल तर ते दाखल करून घेतले जाणार नाही :

परंतु,——

(एक) तीस दिवसांच्या कालावधीची गणना करताना, ज्याविरूद्ध अपील करण्यात आले आहे त्या निर्णयाची किंवा आदेशाची प्रत प्राप्त करण्यासाठी लागणारा कालावधी वगळण्यात आला पाहिजे ;

(दोन) अपील प्राधिकाऱ्यास, योग्य व पुरेशा अशा कारणांवरून अपील दाखल करण्यासाठी (तीस दिवसांहून अधिक नसेल असा) झालेला विलंब (तसा विलंब झाला असेल तर) माफ करता येईल. मात्र, त्याने त्याबद्दलची कारणे लेखी नमूद केली पाहिजेत.

(४) अपीलकर्त्यास त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्याखेरीज, पोट-कलम (१), (२) किंवा (३) खाली दाखल केलेल्या कोणत्याही अपिलावर कोणताही आदेश दिला जाणार नाही ; आणि अपिलात दिलेला प्रत्येक आदेश हा, कलम ६१ पोट-कलम (२), आणि कलम ६२ यांच्या तरतुदींस अधीन राहून, अंतिम आणि निर्णायक असेल.

ज्याविरूद्ध अपील करता येणार नाही असे आदेश. **६०.** (एक) लायसनधारकास, त्याचे लायसन निलंबित किंवा रद्द का करण्यात येऊ नये यासंबंधीचे कारण दर्शविण्यासाठी काढलेल्या नोटिशीसह हा अधिनियम किंवा नियम, विनियम किंवा उप-विधी याअन्वये काढलेली कोणतीही नोटीस ; किंवा

(दोन) लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा अन्य कागदपत्रे यांची जप्ती किंवा ती अटकावून ठेवणे याबाबतचा आदेश ; किंवा

(तीन) या अधिनियमाखाली खटला भरण्यास मंजुरी देणारा आदेश ;

याविरूद्ध कोणतेही अपील किंवा पुनरीक्षणासाठीचा अर्ज दाखल करता येणार नाही.

कोणत्याही प्रकरणाचा अभिलेख मागवण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**६१.** (१) राज्या शासनास, स्वतः होऊन किंवा कलम ५३ खालील अहवाल प्राप्त झाल्यानंतर, किंवा कोणत्याही व्यथित व्यक्तीने केलेल्या अर्जावर, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेला नियम, विनियम किंवा उप-विधी यांअन्वये समितीने किंवा महानगर आयुक्ताने किंवा कोणत्याही अधिकाऱ्याने ज्या प्रकरणी निर्णय दिला असेल आणि ज्यात कोणतेही अपील दाखल करण्यात आलेले नसेल किंवा कोणतेही अपील दाखल करण्यात आले असेल व ते निकालात काढले असेल अशा कोणत्याही प्रकरणातील अभिलेख मागवता येतील ; राज्य शासनास, अशा समितीने किंवा महानगर आयुक्ताने किंवा अधिकाऱ्याने—

(क) कायद्याद्वारे तिच्याकडे किंवा त्याच्याकडे निहित करण्यात न आलेल्या अधिकारितेचा वापर केला आहे ; किंवा

(ख) तिच्याकडे किंवा त्याच्याकडे निहित केलेल्या अधिकारितेचा वापर करण्यात कसूर केली आहे ; किंवा

(ग) तिच्या किंवा त्याच्या अधिकारितेचा वापर करताना बेकायदेशीररीत्या किंवा संपूर्णतः अनियमितपणे कार्यवाही केली आहे ;

असे आढळून आल्यास, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल असे आदेश त्या प्रकरणी देता येतील.

(२) कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम करील असा, या कलमाखालील कोणताही आदेश, असा व्यक्तीला आपले स्पष्टीकरण देण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज काढता येणार नाही.

(३) असा आदेश देण्यात आल्याच्या दिनांकापासून एक वर्ष झाल्यानंतर राज्य शासनाला कोणतेही असे अभिलेख मागविता येणार नाहीत.

(४) राज्य शासनाने या कलमाखाली दिलेला आदेश हा अंतिम व निर्णायक असेल.

आदेश अंतिम असणे.

**६२.** या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही प्राधिकरणाने या अधिनियमाखाली दिलेला प्रत्येक आदेश, अंतिम व निर्णायक असेल, आणि दावा करून, अर्ज दाखल करून किंवा अन्यथा, कोणत्याही न्यायालयात त्यावर आक्षेप घेता येणार नाही.

अधिकारितेस रोध.

**६३.** या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये ज्या प्रश्नाचा निर्णय किंवा त्यावरची कार्यवाही राज्य शासनाला किंवा समितीला किंवा कोणत्याही अधिकाऱ्याला करावयाची असेल आणि ज्या बाबतीत राज्य शासनाचा, समितीचा किंवा अधिकाऱ्याचा निर्णय हा अंतिम व निर्णायक असेल असा (कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा अन्य कार्यवाही यांमधील) कोणताही प्रश्न दाखल करून

घेण्याची, त्याबाबत निर्णय देण्याची, किंवा त्यावर कार्यवाही करण्याची कोणत्याही दिवाणी न्यायालयास अधिकारिता असणार नाही आणि या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराच्या अनुषंगाने केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीसंबंधात, कोणत्याही न्यायालयास किंवा अन्य प्राधिकाऱ्यास कोणत्याही प्रकारची निषेधाज्ञा मंजूर करता येणार नाही.

अपराध व शास्ती.

**६४.** (१) जो कोणी,—

(क) कलम ७ च्या खंड (१) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लघंन करील ; किंवा

(ख) त्याच्या आवाक्याबाहेरील कारणावरून असेल त्याशिवाय, कलम २५, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लघंन करील ; किंवा

(ग) महानगर आयुक्ताला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला खंड (क) अन्वये तपासणी करण्यात किंवा कलम ५२, खंड (घ) खालील चौकशी करण्यात, स्वेच्छेने अडथळा आणील ; किंवा

(घ) कोणत्याही आवश्यक गोष्टींचे पालन करण्यात जाणूनबुजून कसूर करील किंवा कलम ५२ चा खंड (ग) किंवा (घ) अन्वये खोटे विवरण, विवरणपत्र, लेखा, निवेदनपत्रक किंवा कार्यवृत्त जाणूनबुजून सादर करील ; किंवा

(ड) कोणतीही माहिती पुरवण्यात जाणूनबुजून हयगय करील किंवा त्यास नकार देईल किंवा कलम ५३ अन्वये जाणूनबुजून खोटी माहिती पुरवील ; किंवा

(च) समितीची कोणतीही पुस्तके, अभिलेख, निधी व मालमत्ता जप्त करणाऱ्या किंवा ताब्यात घेणाऱ्या महानगर आयुक्ताला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला स्वेच्छेने अडथळा आणील किंवा कलम ५४ अन्वये अशा व्यक्तीला वरील गोष्टी देण्यात हेतुपुरस्सर कसूर करील ; किंवा

(छ) खंड (क) ते (च) मध्ये केलेली कोणतीही कृती करण्यास कोणत्याही व्यक्तीस मदत करील किंवा प्रोत्साहन देईल त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर,—

(एक) जेव्हा अपराध, खंड (क) किंवा (ख) खालील असेल तेव्हा, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या देन्ही शिक्षा होतील.

(दोन) जेव्हा अपराध, खंड (ग), (घ), (ङ) किंवा (च) खालील असेल तेव्हा, तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(तीन) जेव्हा अपराध, खंड (छ) खालील असेल तेव्हा, ज्या अपराधास मदत वा प्रोत्साहन देण्यात आले असेल त्या अपराधासाठी असेल तीच शिक्षा होईल.

(चार) खंड (क) खालील अपराध जेव्हा पहिल्या वेळच्या अपराध सिद्ध झाल्यानंतर, पुन्हा चालू ठेवण्यात आला असेल तेव्हा, अपराध चालू ठेवण्यात आला त्या कालावधीत दर दिवसाला शंभर रुपयांहून अधिक होणार नाही इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क) खालील एखाद्या अपराधाची दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्यास, त्याला आवश्यक वाटेल असा साक्षीपुरावा गोळा केल्यावर जर असे आढळून आले की, आरोपी व्यक्ती ही, कलम ७, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करून एखाद्या बाजारक्षेत्रात कोणताही विनिर्दिष्ट व्यापार करीत आहे, तर तिला,—

(एक) ज्या विक्रेय वस्तूचा व्यापार करण्यात येत असेल त्या वस्तूचा साठा जप्त करून समितीच्या ताब्यात ठेवण्याचा आदेश देता येईल ; किंवा

(दोन) जेव्हा साठा जप्त करणे व ताब्यात ठेवणे शक्य नसेल तेव्हा, आरोपी व्यक्तीने, तक्रारीचा अंतिम निर्णय लागेपर्यंत दंडाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय तो साठा हलवू नये, देऊन टाकू नये किंवा अन्य प्रकारे हाताळू नये, असा आदेश देता येईल ; आणि

(तीन) तक्रारीचा अंतिम निर्णय लागेपर्यंत, आरोपी व्यक्तीने, कलम ७, पोट-कलम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करून बाजारक्षेत्रात विनिर्दिष्ट व्यापार करू नये, असा आदेश देता येईल.

(३) जेव्हा अशी आरोपी व्यक्ती कलम ७, पोट-कलम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल सिद्धापराधी ठरली असेल तेव्हा, पोट-कलम (२) अन्वये ज्या विक्रेय वस्तूंबद्दल आदेश काढण्यात आला असेल त्या वस्तुंचा साठा राज्य शासनाकडे जमा केला पाहिजे, आणि जेव्हा अशा व्यक्तीला दोषमुक्त करण्यात किंवा विनादोषारोप सोडण्यात येईल तेव्हा, जो मालाचा साठा जर जप्त करून समितीच्या ताब्यात ठेवण्यात आला असेल तर तो साठा त्या व्यक्तीस परत केला पाहिजे.

**६५.** (१) जेव्हा या अधिनियमाखालील अपराध हा एखाद्या कंपनीने केलेला असेल तेव्हा, अपराध घडण्याच्या वेळी, कंपनीच्या कामकाजाचा प्रभार असणारी आणि कंपनीच्या कामकाजाबाबत जबाबदार असणारी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी ही, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल आणि तिच्याविरूद्ध खटला भरला जाण्यास व तद्नुसार शिक्षा होण्यास ती पात्र ठरेल : कंपन्यांचे अपराध.

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने, जर असा अपराध आपल्या नकळत घडला आहे किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्व प्रकारची खरबदारी घेतली होती, असे सिद्ध केले तर, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध हा, एखाद्या कंपनीने केलेला असेल आणि तो अपराध कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या किंवा व्यवस्थपकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूक संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे घडला असल्याचे सिद्ध झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल आणि त्यांच्याविरूद्ध खटला भरला जाण्यास व तद्नुसार शिक्षा होण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " म्हणजे, निगमनिकाय आणि त्यात, भागीदारी संस्था, व्यक्तींचा संघ किंवा संस्था, मग ती विधिसंस्थापित असो वा नसो,— यांचा समावेश होतो, आणि

(ख) भागीदारी संस्थेच्या संदर्भात, " संचालक " म्हणजे, भागीदारी संस्थेतील भागीदार आणि व्यक्तींच्या कोणत्याही संघाच्या वा संस्थेच्या बाबतीत, त्या संघाचे व्यवहार सांभाळणारा कोणताही सदस्य.

अपराधांची दखल व न्याय चौकशी.

६६. (१) महानगर आयुक्ताची किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची किंवा महानगर आयुक्ताने किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने या संदर्भातील सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अन्य व्यक्तींची पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज, कोणत्याही न्यायलयाला, या अधिनियमा खालील शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाची दखल घेता येणार नाही :

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ६४, १९७४
पोट-कलम (१) खालील अपराध दखलपात्र व जामीनयोग्य असेल. चा २.

(३) महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्गाच्या न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या असलेल्या कोणत्याही न्यायालयास, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधाची न्यायचौकशी करता येणार नाही.

अपराध आपसात मिटवणे.

६७. (१) मुख्य कार्याकारी अधिकाऱ्यांस या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबाबतचे [ कलम ६४, पोट-कलम (१), खंड (क) खालील अपराधाव्यतिरिक्त ] कामकाज सुरू होण्यापूर्वी वा सुरू झाल्यानंतर महानगर आयुक्ताच्या मान्यतेने, असा अपराधाबाबत आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तींकडून, अपराध, आपसात मिटविण्यासाठी, कलम ६४ मध्ये नमूद केलेल्या संबंधित अपराधासाठी असलेल्या कमाल द्रव्य दंडाच्या रकमेहून कमी नसेल आणि त्या रकमेच्या दुपटीहून अधिक नसेल अशी, तो ठरविल इतकी रक्कम स्वीकारता येईल.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी पोट-कलम (१) अन्वये ठरवील अशी रक्कम देण्यात आल्यावर ;आरोपी व्यक्तीविरूद्ध त्याच अपराधाबद्दल कोणतीही पुढील कार्यवाही करता येणार नाही आणि आधीच काही कार्यवाही केलेली असल्यास ती समाप्त झाली पाहिजे आणि आरोपी व्यक्ती, कैदेत असल्यास तिला सोडून दिले पाहिजे.

## प्रकरण दहा

## नियम व उप-विधी

नियम करण्याचा अधिकार.

**६८.** (१) या अधिनियमाखाली नियम करण्याचा अधिकार राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वापरता येईल.

(२) या अधिनियमात अन्यत्र असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न आणता, राज्य शासनास, साधारणतः या अदिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करता येतील, आणि अशा नियमांमध्ये या अधिनियमाच्या

कोणत्याही प्रयोजनार्थ फी आकारण्यासंबंधीच्या आणि अशी फी किंवा तिचा काही भाग परत देण्यासंबंधीच्या नियमांचाही समावेश असू शकेल.

(३) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनाच किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल. आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **राजपत्र** अधिसूचित करील तर, अशी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील, किंवा येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

उप-विधी करण्याचा समितीचा अधिकार.

**६९.** (१) या अधिनियमाखालील सर्व उप-विधी करण्याचा अधिकार यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीस अधीन राहून समितीस वापरता येईल.

(२) या अधिनियमात उप-विधी करण्यासाठी अन्यत्र अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अधिकारास बाध न आणता, कोणत्याही समितीस आपले कामकाज करण्यासाठी आणि आपली स्थायी समिती, उपसमिती, अधिकारी आणि सेवक यांच्या मार्गदर्शनासाठी या अधिनियमाशी आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांशी सुसंगत असे उप-विधी करता येतील.

(३) (क) समितीने, जेव्हा जेव्हा तिला या अधिनियमाखाली उप-विधी करावयाचे असतील तेव्हा विशेष बैठकीतील ठरावाद्वारे अशा उप-विधीच्या मसुद्यात मान्यता दिली पाहिजे.

(ख) असा ठराव संमत करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, समितीने उप-विधींचा मसुदा आपल्या सूचना फलकावर लावला पाहिजे आणि बाजारक्षेत्रात खप असणाऱ्या किमान दोन वृत्तपत्रात आणि समितीच्या मते जनतेला आणि अशा प्रकारे लावण्यात आलेल्या उप-विधीमुळे ज्यांच्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे अशा सर्व व्यक्तींना निश्चितपणे कळेल अशा पद्धतीने एक नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे. अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करावयाच्या वाजवी कालावधीच्या आत प्रस्तावित मसुद्याच्या संबंधातील आक्षेप आणि सूचना मागविल्या पाहिजेत.

(४) कोणतेही आक्षेप आणि सूचना आल्या असतील तर, समितीने त्यावर विचार केला पाहिजे आणि तिला, ठरावाद्वारे उप-विधींच्या अंतिम मसुद्यास मान्यता देता येईल.

(५) असा ठराव मंजूर करण्यात आल्यापासून सात दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने पोट-कलम (४) अन्वये संमत करण्यात आलेल्या उप-विधींचा अंतिम मसुदा महानगर आयुक्ताला सादर केला पाहिजे आणि आयुक्ताने, ती मसुदा आपल्या शिफारशींसह राज्य शासनाकडे पाठविला पाहिजे. राज्य शासन, त्याच्याकडे पाठवण्यात आलेल्या उप-विधींमध्ये कोणतेही फेरफार करणे त्यास आवश्यक वाटल्यास, अशा फेरफारांसह त्या उप-विधींना मंजुरी देऊ शकेल.

प्रकरण अकरा

## संकीर्ण

अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**७०.** (१) राज्य शासनास, एकतर स्वतः होऊन किंवा प्राधिकरणाच्या तशा अर्थाच्या शिफारशींनुसार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचीतील कोणत्याही विक्रेय वस्तूच्या किंवा विक्रेय वस्तूच्या वर्गाच्या संबंधातील कोणत्याही नोंदीमध्ये भर घालता येईल, तीत सुधारणा करता येईल, किंवा ती रद्द करता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, राज्य शासनाने किंवा यथास्थिति, प्राधिकरणाने **राजपत्रात** तसेच, मुंबई महानगर प्रदेशात खप असणाऱ्या किमान दोन वृत्तपत्रांत एक नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे. अशा नोटिशीद्वारे, शिफारस करण्याचा, अशी अधिसूचना काढण्याचा शासनाचा किंवा, यथास्थिती, प्राधिकरणाचा हेतूने जाहीर करण्यात येईल आणि उक्त प्रस्तावाबाबत ज्यांचा कोणताही आक्षेप असेल त्या सर्व व्यक्तींना **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आपले आक्षेप, त्याबद्दलच्या कारणासह, शासनाकडे किंवा यथास्थिति, प्राधिकरणाकडे सादर करण्यास सांगण्यात येईल आणि उक्त प्राधिकरणाने आपणास मिळालेले उक्त आक्षेप, तसे आक्षेप असल्यास, आपल्या शिफारशींसह, राज्य शासनाकडे पाठविले पाहिजेत. आक्षेप मागवण्यासंबंधीचा प्रस्ताव प्राधिकरणाने प्रसिद्ध केलेला असेल त्याबाबतीत, आक्षेप मागवण्यासंबंधीचा तसाच प्रस्ताव राज्य शासनाने पुन्हा प्रसिद्ध करण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) जर अशा प्रकारे आलेले किंवा पाठवले गेलेले कोणतेही आक्षेप शासनाच्या मते अपुरे अथवा विधिग्राह्य नसतील तर, राज्य शासनाला उपरोक्तप्रमाणे अशी कोणतीही अधिसूचना काढता येणार नाही.

समितीचा सभापती उप सभापती, सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकारी आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे.

७१. समितीचा सभापती, उप सभापती, सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकारी आणि कर्मचारी हे, हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली केलेले नियम, विनियम किंवा उप-विधी यांच्या तरतुदींनुसार एखादी कृती करीत असतील किंवा तशी कृती करीत असल्याचे अभिप्रेत असेल तेव्हा, ते भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

सद्भावनापूर्वक करण्यात आलेल्या कृतीचे संरक्षण.

७२. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम, विनियम किंवा उप-विधीअन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल समितीचा कोणताही सभापती, उप सभापती, सदस्य, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या विरूद्ध किंवा राज्य शासन किंवा प्राधिकरण, महानगर आयुक्त किंवा राज्य शासनाचा अथवा प्राधिकरणाचा कोणताही अधिकारी यांच्या विरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

७३. (१) समितीकडून शासनाला देय असलेली प्रत्येक रक्कम ही, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.

शासनास अथवा समितीस देय असलेल्या रकमांची वसुली.

(२) हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम, विनियम किंवा उप-विधी यांच्या तरतुदीअन्वये, कोणताही आकार, परिव्यय, खर्च, फी, भाडे, नुकसानभरपाई किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे समितीला देय असलेली कोणतीही रक्कम ही, अशी रक्कम ज्या व्यक्तीकडून वसूल करावयाची असेल त्या व्यक्तींकडून जमीन महसुलाची थकबाकी ज्या रीतीने वसूल केली जाते त्याच रीतीने वसूल करण्यायोग्य असेल.

७४. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि त्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्तीच्या, कोणत्याही असल्यास, अधीन राहून, नियम करण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त, त्यास या अधिनियमांद्वारे आणि तद्न्वये प्रदान करण्याच आलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार, महानगर आयुक्तांकडे अथवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्यांकडे अथवा व्यक्तीकडे प्रत्यायोजित करता येतील आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये असलेले महानगर आयुक्तांचे कोणतेही अधिकार, कर्तव्ये किंवा कामे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

प्रत्यायोजनाचा अधिकार.

७५. मुंबई भाडे, हॉटेल आणि निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ हा,—

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७ लागू नसणे.

(क) या अधिनियमान्वये किंवा त्याच्या प्रयोजनार्थ समितीच्या किंवा तिच्याकडे निहित असलेल्या कोणत्याही जागांना लागू असणार नाही ;

(ख) अशा कोणत्याही जागांच्या संबंधात समितीने निर्माम केलेली कोणतीही भाडेदारी, लायसन अथवा अन्य तत्सम स्वरूपाच्या संबंध याच्या संदर्भात समितीच्या विरूद्ध लागू होणार नाही ;

(ग) परंतु, समितीला भाड्याने अथवा लायसनवर दिलेल्या कोणत्याही जागांना लागू होईल.

७६. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुसार अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट, आदेशाद्वारे करता येईल :

अडचणी दूर करणे.

परंतु, हा अधिनियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे संपल्यानंतर, या कलमाखाली कोणताही आदेश काढता येणार नाही.

## अनुसूची

[ कलमे २, (१६) आणि ७० पहा ]

१. वस्त्रे, म्हणजेच सर्व प्रकारचे कापड, परंतु त्यात कापडापासून तयार केलेल्या ‘ तयार ’ कपड्यांचा समावेश होणार नाही.

२. लोखंड व पोलाद.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई